मंगळवार, ९ ऑगस्ट २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक २३
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## सागरातील संशोधनासाठी भारताची समुद्रयान मोहीम



**नवी दिल्ली** : अथांग सागरातील संशोधनासाठी केंद्र सरकारने समुद्रयान ही मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेंतर्गत तीन तज्ज्ञांची टीम समुद्रात सहा हजार मीटर खाली पाठविण्यात येईल. यासाठी नुकत्याच तयार करण्यात आलेल्या 'मत्य ६०००' या समुद्रात खोलवर जाऊन खनिजांचा शोध घेणाऱ्या वाहनाचा वापर करण्यात येणार आहे. भारत तिन्ही बाजूंनी महासागरांनी वेढलेला आहे आणि देशातील सुमारे ३० टक्के लोकसंख्या किनारी भागात राहते, जेथे लोकांचे मुख्य आर्थिक स्त्रोत मत्स्यपालन आणि पर्यटन आहे. भारताला ७५१७ किमी लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे, ज्यामध्ये नऊ राज्ये आणि १३८२ बेटांचा अंतर्भाव आहेत. त्यामुळे भारतासाठी पाण्याखाली शोध घेणे हे महत्त्वाचे तसेच फायदेशीर ठरणारे आहे. यामुळे अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.


### अंतरंग
मच्छीमारांच्या समस्या दूर करा; आ. महेश बालदींचे साकडे/३
रायगड जिल्ह्यामध्ये पावसाचा जोर वाढला/५
फुटबॉल स्पर्धेत कालिना रेंजर संघ विजेता/८


# राज्य मंत्रिमंडळाचा आज विस्तार



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार मंगळवारी (दि. ९) होणार आहे. सकाळी ११ वाजता राजभवनमध्ये शपथविधी सोहळा होईल. याबाबत जनसंपर्क कार्यालयाने पत्रक जारी केले आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत भाजपश्रेष्ठींशी चर्चा केली आहे. त्यानुसार काही मंत्री पहिल्या टप्प्यात शपथ घेतील. यात भाजपमधून चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, प्रवीण दरेकर, राधाकृष्ण विखे-पाटील, गणेश नाईक आदींची; तर शिंदे गटातून दादा भुसे, उदय सामंत, संदिपान भुमरे, भरत गोगावले, गुलाबराव पाटील, शंभूराज देसाई, दीपक केसरकर, संजय शिरसाट यांची संभाव्य मंत्री म्हणून चर्चा आहे. याशिवाय अपक्ष आमदार बच्चू कडू यांनाही मंत्रिमंडळात स्थान दिले जाण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालय आणि निवडणूक आयोगाचा निकाल आल्यानंतर पूर्ण विस्तार होईल.

मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस हे नुकतेच दिल्लीत जाऊन आले. त्यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराबाबतच्या चर्चांना उधाण आले होते. अखेर त्यावर शिक्कामोर्तब झाले असून कुणाचा शपथविधी होतो आणि नव्या मंत्र्यांना कुठल्या खात्याची जबाबदारी दिली जाते याची सर्वांना उत्सुकता आहे.

## पावसाळी अधिवेशन १७ ते २६ ऑगस्टदरम्यान?

राज्य विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन पुढे ढकलले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हे अधिवेशन १० ते १७ ऑगस्ट या काळात होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत होती, पण आता ते १७ ते २६ ऑगस्ट या काळात होईल, असे सांगितले जात आहे. मंत्रिमंडळ विस्तार झाल्यास प्रत्येक मंत्र्याला आपल्या खात्याची जबाबदारी समजून घ्यावी लागणार आहे, कारण काही मंत्री नव्याने शपथ घेणार आहेत. त्यामुळे त्यांना थोडा वेळ देणे आवश्यक आहे. म्हणून अधिवेशन पुढे ढकलण्यात आल्याचे सांगितले जात आहे.




# दर्जेदार शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना चांगल्या संधी -लोकनेते रामशेठ ठाकूर

## 'आरटीपीएस'मधील सोहळ्यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या (आरटीपीएस) माध्यमातून मिळत असलेल्या दर्जेदार शिक्षणामुळे येथील विद्यार्थ्यांना अनेक चांगल्या संधी निर्माण होत आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळातही स्कूल प्रगतीच्या दिशेने काम करीत राहिल, असा विश्वास जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला. ते स्कूलच्या स्थापना दिन सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा ११वा स्थापना दिन रविवारी (दि. ७) मोठ्या उत्साहात साजरा झाला. या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, शकुंतला रामशेठ ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, उपसचिव श्री. थोरात, संचालिका वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, मुख्याध्यापिका राज अलोनी, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक प्रवीण पाटील, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, ज्येष्ठ नेते प्रभाकर जोशी, दीपक शिंदे, साधना पवार, कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्सच्या श्रीमती नायर, सीकेटी विद्यालयाच्या संध्या अय्यर यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये दरवर्षी ७ ऑगस्ट हा दिवस शाळेचा स्थापना दिन म्हणून साजरा केला जातो. या शाळेचा पाया लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी घातला आहे. या दिवशी शाळेतील निवडलेले विद्यार्थी प्रतिनिधी शपथ घेतात. या सोहळ्याची सुरुवात शाळेतील विद्यार्थ्यांच्या समूह गायनाने झाली. त्यानंतर आदेश ठाकूर याने लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा परिचय करून दिला. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या राज्यांतील लोकनृत्ये सादर केली.

शैक्षणिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२मध्ये इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उत्तुंग यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा चषक, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम देऊन मान्यवरांच्या हस्ते या वेळी सत्कार करण्यात आला. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमधील विद्यार्थी सध्या जगभरात वेगवेगळ्या ठिकाणी आयआयटी, एमबीबीएस, एलएलबी, बी.टेक अशा वेगवेगळ्या क्षेत्रांत पुढील शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या शिक्षकांचासुद्धा या सोहळ्यात सत्कार करण्यात आला.

# राष्ट्रकुल स्पर्धेत बॅडमिंटनमध्ये भारताची सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक



**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताने सोमवारी (दि. ८) बॅडमिंटन या क्रीडाप्रकारात सुवर्णपदकाची हॅट्ट्रिक साजरी केली. सर्वप्रथम पी. व्ही. सिंधूने महिला एकेरीत सोनेरी कामगिरी केली. त्यानंतर पुरुष एकेरीत लक्ष्य सेनने बाजी मारली. मग चिराग शेट्टी आणि सात्विक रानकीरेड्डी यांनी पुरुषांच्या दुहेरीत आणखी एक सुवर्णपदक भारताच्या झोळीत टाकले.

दरम्यान, भारताचा आघाडीचा टेबल टेनिसपटू शरथ कमल याने पुरुष एकेरीत भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. त्याने अंतिम सामन्यात इंग्लंडच्या लियाम पीचफोर्ड याला ११-१३, ११-७, ११-२, ११-६, ११-७च्या फरकाने पराभूत केले. शरथच्या सामन्यापूर्वी साथियान गनसेकरन याने इंग्लंडच्याच पॉल ड्रिंकहॉल याला ४-३च्या फरकाने मात देत कांस्यपदक जिंकले.

**भारत 'टॉप फाईव्ह'मध्ये**

भारताने राष्ट्रकुल स्पर्धेच्या अखेरच्या दिवशी चार सुवर्णपदकांची भर घालून गुणतालिकेत चौथ्या स्थानी झेप घेतली. भारताने एकूण २२ सुवर्ण, १६ रौप्य व २३ कांस्यपदकांची कमाई करून एकूण ६१ पदके नावावर केली आहेत.

## शिवसेना नेते संजय राऊतांची आर्थर रोड जेलमध्ये रवानगी



**पत्राचाळ घोटाळाप्रकरणी २२ ऑगस्टपर्यंत न्यायालयीन कोठडी**

**मुंबई : प्रतिनिधी**

पत्राचाळ घोटाळाप्रकरणी शिवसेना खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत यांना २२ ऑगस्टपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. ईडीने (सक्तवसुली संचालनालय) राऊत यांना अटक केलेली आहे. दरम्यान, आता राऊत यांचा मुक्काम मुंबईतील आर्थर रोड कारागृहात असणार आहे.

अटकेनंतर संजय राऊत मागील काही दिवसांपासून ईडी कोठडीत होते. त्यांना सोमवारी (दि. ८) पीएमएलए न्यायालयात हजर करण्यात आले. या वेळी न्यायालयाने त्यांना २२ ऑगस्टपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली.

## निवडक

### जेईई परीक्षेचा निकाल जाहीर; २४ उमेदवारांना १००% गुण

**नवी दिल्ली** : नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) सोमवारी (दि. ८) जेईई मेन परीक्षा २०२२चा अंतिम निकाल जाहीर केला. सत्र १ व सत्र २च्या कामगिरीवर आधारित एकूण गुणवत्ता यादीत तब्बल २४ उमेदवारांनी १०० टक्के गुण मिळवले आहेत. या परीक्षेचा निकाल अधिकृत वेबसाइट jeemain.nta.nic.inवर उपलब्ध आहे.

### भंडारा सामूहिक बलात्कारप्रकरणी पोलीस अधिकारी, कर्मचारी निलंबित

**भंडारा** : येथील सामूहिक बलात्कारप्रकरणी भंडारा पोलिसांनी मोठी कारवाई केली असून कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत एक पोलीस अधिकारी आणि दोन कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे. त्याचप्रमाणे मुख्य आरोपीला १२ तासांच्या आत बेड्या घातल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात आला आहे. लाखनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या बलात्कारानंतर एकच खळबळ उडाली होती. पोलिसांनी पावले उलचत शोधमोहीम सुरू केली असून दोषींवर कारवाईस सुरुवात केली आहे.

# कामोठ्यात मोफत आधार कार्ड शिबिर

■ आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून उपक्रमाला शुभेच्छा



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त कामोठे येथील रविशेठ जोशी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने मोफत आधार कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात आयोजित या शिबिराचे उद्घाटन माजी नगरसेवक विजय चिपळेकर यांच्या हस्ते सोमवारी (दि. ८) झाले, तर या शिबिराला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदिच्छा भेट दिली.

या शिबिराच्या उद्घाटनावेळी भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक विकास घरत, गोपीनाथ भगत, दिलीप पाटील, माजी नगरसेविका पुष्पा कुत्तरवडे, संतोषी तुपे, भटके विमुक्त आघाडीच्या महिला जिल्हाध्यक्ष विद्या तामखेडे, ओबीसी सेल अध्यक्ष भाऊ भगत, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, कामोठे व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नानासाहेब मगदूम, भाजप महिला मोर्चा सरचिटणीस साधना आचार्य, कामोठे भाजप व्यापार आघाडीचे सहसंयोजक उत्तम जाधव, (पान २ वर..)

# पेणमध्ये सामुदायिक शेती

## ग्रामस्थांच्या एकोप्याचे दर्शन



(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

हवामानातील बदलामुळे शेतकरीवर्ग हैराण झाला असून सध्याच्या परिस्थितीत शेती करणे खूप कठीण झाले आहे, परंतु पेण तालुक्यातील खारेपाट भागात सर्व कान्होबा गावकरी आजही एकत्र येऊन पूर्वजांपासून चालत आलेली परंपरा अबाधित ठेवत सामुदायिक शेती करीत आहेत. यातून गावातील एकोपाही कायम राहत आहे.

मागील दोन वर्षे कोरोना विषाणूच्या प्रादूर्भावामुळे सामुदायिक शेती करणे कठीण झाले होते, पण या वर्षी गावातील सर्व शेतकरी एकत्र येत कान्होबा देवस्थानच्या शेतीची लावणी करताना मग्न होते. या शेतकऱ्यांमध्ये डॉक्टर, इंजिनिअर तसेच वेगवेगळ्या क्षेत्रांतील तरुण सहभागी झाले होते. या वेळी ढोल वाजवून व आपल्या ग्रामदेवतेची गाणी म्हणत आनंद व्यक्त करताना शेतकरी दिसून आले.

## एकपात्री व द्विपात्री अभिनय स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रंगमंचावर एकटा असूनही प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा कलाकार हा ताकदीचा मानला जातो. एकपात्री किंवा द्विपात्री नाट्य सादर करताना कलाकाराचा अभिनय लक्षवेधी असावा लागतो. अशाच कलाकारांच्या अभिनयाची कसोटी पाहण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा पुरस्कृत भाजप सांस्कृतिक सेल उत्तर रायगडच्या वतीने एकपात्री व द्विपात्री अभिनय स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यंदाचे या स्पर्धेचे तिसरे वर्ष आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल दरवर्षी वेगवेगळ्या नाट्यस्पर्धांचे आयोजन करतात. 'रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा' असे म्हणत अटल करंडक एकांकिका स्पर्धा, मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धा, एकपात्री आणि द्विपात्री अभिनय स्पर्धांचे आयोजन केले जाते आणि कलाकारांच्या आविष्काराला दाद दिली जाते. या स्पर्धा राज्यस्तरीय पातळीवर होतात. महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांतून वेगवेगळ्या नाट्य संस्था यात सहभागी होतात. (पान २ वर..)




# मुख्यमंत्र्यांचा दिल्लीत कायम सन्मान

## फोटोवरील राजकारणावरून आमदार उदय सामंत यांचे प्रत्युत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

नीती आयोगाच्या रविवारी (दि. ८) झालेल्या बैठकीतील एका फोटोवरून सध्या महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये चर्चेचा विषय ठरत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी आक्षेप नोंदवल्यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक आमदार उदय सामंत यांनी, एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर कायमच त्यांचा सन्मान केला असल्याचे सांगितले.



नीती आयोगाच्या बैठकीला उपस्थित असणाऱ्या सर्व मुख्यमंत्र्यांसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नीती आयोगाच्या अधिकाऱ्यांचा फोटो बैठकीनंतर काढण्यात आला. या फोटोत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अगदी शेवटच्या रांगेत उभे असल्याचे दिसत आहे. याच मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी आक्षेप नोंदवल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक आमदार उदय सामंत यांनी त्यांना राष्ट्रपतींच्या शपथविधी प्रसंगाची आठवण करून देत प्रत्युत्तर दिले आहे.

उदय सामंत म्हणाले की, फोटो बघितल्यावर एक लक्षात येते की, एकनाथ शिंदे केवळ फोटोसाठी तिथे उभे होते, मी आपल्याला सांगू इच्छितो, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या शपथविधीच्या कार्यक्रमात शिंदे पहिल्या रांगेत होते याची त्यांनी आठवण करून दिली. राष्ट्रपतींचा शपथग्रहण सोहळा ज्या दिवशी झाला त्या दिवशी एकनाथ शिंदे हे पहिल्या रांगेत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या बाजूला होते. ते कोणाला दिसले नाही हे आपले दुर्दैव आहे, असे उदय सामंत म्हणाले.

कुठे तरी राजकारणासाठी राजकारण करण्यात अर्थ नाही. महाराष्ट्राचा मानसन्मान दिल्लीमध्ये एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्याने नक्की वाढलेला आहे. त्याची प्रचिती ओबीसी आरक्षणापासून अनेक गोष्टींमधून आलीय. शिंदेंचा कोणता अपमान केलाय असे मला तरी वाटत नाही, असेही उदय सामंत म्हणाले.

# गणेशोत्सव मंडळांना पमपा देणार ऑनलाइन परवानगी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका गणेशोत्सवासाठी गणेशमंडळांना ऑनलाइन पद्धतीने परवानगी देणार आहे. याचे प्रात्यक्षिक आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सोमवारी (दि. ८) झालेल्या बैठकीत देण्यात आले. या वेळी आयुक्तांनी नोंदणी फी कमी करण्याचे आश्वासनही दिले.

या बैठकीला अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कल्पिता पिंपळे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, महापालिका अधिकारी, पोलीस विभाग, गणेशमंडळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. गणेशमंडळांना ऑनलाइन अर्ज करण्याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. गणेशोत्सव मंडळाने उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये वाहतुकीला व पादचाऱ्यांना अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेऊन मंडप उभारावे, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले. यावर्षी ५७ विसर्जन घाटावर पालिकेच्या वतीने विसर्जनासाठी सर्व सोयीसुविधा पुरविण्यात येणार आहेत.

गणेशमंडळांना ऑनलाइन परवानगीसाठी http://smartpmc.in/Login ही वेबसाईट तयार केली आहे. या अर्जासोबत धर्मादाय आयुक्तांकडील नोंदणी प्रमाणपत्र, जागा मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र, स्थळदर्शक नकाशा स्कॅन करून अपलोड करणे गरजेचे आहे. महापालिकेच्या वतीने एक खिडकी योजनेंतर्गत अग्निशमन ना हरकत दाखला, वाहतूक ना हरकत दाखला व महानगरपालिकेची मंडप उभारण्याबाबतची परवानगी मिळणार आहे. अधिक माहितीसाठी महापालिकेच्या १८००-२२७-७०१ या टोल फ्री क्रमांक, तसेच ई-मेल panvelcorporationgmail.com, दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५८०४०/४१/४२, व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक व एसएमएस. सुविधेसाठी ९७६९०१२०१२ हे क्रमांक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

**गणेशोत्सवापूर्वी शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरावेत. ही जबाबदारी महापालिकेची असल्याचे सिडको सांगत असल्याने महापालिकेने रस्ते लवकर दुरूस्त करावेत, तसेच वाहतूक पोलिसांवर या वेळी मोठा ताण येत असतो, यासाठी महासभेत ठराव मंजूर करण्यात आलेले ट्रॅफिक वार्डनची लवकर नेमणूक करावी.**
**-परेश ठाकूर, माजी सभागृह नेते**





(छाया : लक्ष्मण ठाकूर)

## लाखोंच्या दागिन्यांची चोरी करणारा अटकेत

**पनवेल** : बंद घराच्या बेडरुममधील कपाटात ठेवलेले १३ लाखांचे दागिने चोरणाऱ्या आरोपीस खांदेश्वर पोलिसांनी अटक केली आहे.

मंगेश पुरुषन यांचे नवीन पनवेल येथे घर असून ते कामानिमित्तबाहेर गेले होते. त्यावेळी बंद घराच्या दरवाजाचे कोयंडा तोडून १३ लाखांचे दागिने, रोख रक्कम व परदेशी चलन असे चोरट्याने लंपास केले. खांदेश्वर पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल होताच पोलीस पथकाने आरोपी अलीमुद्दीन अब्दुल हमीद (४७), साजीद खुबनसीब (२७), मोहम्मद रमजानी मोहम्मद हनीफ यांना नवी दिल्लीतील गोकुळपुरी पोलीस ठाणे येथून अटक केली. त्यांनी चोरल्यापैकी नऊ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

# नेरूळमध्ये स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

माजी आमदार संदीप नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त नेरूळ येथील भाजपचे अक्षय पाटील यांच्या वतीने स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

येथील वझिराणी स्पोर्ट क्लब सेक्टर १८ सिग्नल ते नेरुळ सेक्टर ६ पामबीच सिग्नल वॉकिंग फूटपाथवर ब्लिचिंग पावडर टाकून स्वच्छ केले. या वेळी माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे, समाजिक कार्यकर्ते गणेश भगत, ॲड. निरंत पाटील, गणपत बुवा भोपी, शेखर भोपी, जितेश म्हात्रे, संदेश गायकवाड, अरविंद ठाकूर,निलेश ठाकूर, सुबोध ठाकूर, तुषार म्हात्रे, निशांत भोपी उपस्थित होते. या वेळी अक्षय पाटील यांनी तिरंग्याचे वाटप केले, तसेच नेरूळ विभागात कापडी पिशव्यांचे वाटप करीत जनजागृती केली.



# हर घर तिरंगा अभियानांतर्गत जासई विद्यालयात प्रभातफेरी

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनियर कॉलेज येथे हर घर तिरंगा अभियानांतर्गत सोमवारी (दि. ८) प्रभातफेरी काढण्यात आली. प्रभातफेरीचा शुभारंभ कामगार नेते भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री, स्थानिक व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील यांच्या हस्ते झाला, तसेच विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.



इयत्ता ८ वी ते ११वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी देशप्रेमावर घोषणा देऊन विविध देखावे, वेशभूषा करून सहभागी झाले होते. प्रभातफेरीसाठी जासई ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष घरत, माजी सभापती नरेश घरत, उरण पं. स. शिक्षण विभागातील अनिता काटले प्रतिनिधी म्हणून उपस्थित होत्या.

विद्यालयात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन सुरू आहे. या कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक, रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर अरुण घाग यांचे विशेष मार्गदर्शन लाभत आहे, तसेच रयत सेवक संघाचे महाराष्ट्राचे समन्वयक नुरा शेख, गुरुकुल विभाग प्रमुख जी. आर. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख एस. एस. शिंदे व विद्यालयातील इतर सर्व सेवकांचा हिरीरीने सहभाग मिळत आहे.

# लोकमान्य राष्ट्रोत्सव ठेव योजनेचा प्रारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

आझादी का अमृत महोत्सवानिमित्त लोकमान्य को-ऑप. सोसायटीत लोकमान्य राष्ट्रोत्सव ठेव योजना १ ऑगस्टपासून सुरू करण्यात आली आहे. योजनेचा शेवटचा दिवस ३१ ऑगस्ट आहे. त्यामुळे या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाल्यानिमित्त ही योजना सुरू केली आहे. ठेवीची किमान रक्कम ७५ रु. हजार आणि त्यानंतर ७५ हजार रु. च्या पटीत आहे. ठेवीची मुदत ७५० दिवस इतकी आहे. व्याजदर ९.७५ टक्के असून दर तिमाहीत व्याज दिले जाईल.

ही ठेव योजना केवळ सदस्यांसाठीच उपलब्ध आहे. पाल्यांच्या नावेसुद्धा या योजनेत भाग घेण्याची सोय आहे, पण पालकांनी संस्थेचे सभासद असणे गरजेचे आहे. ठेव रकमेच्या ९० टक्क्यांपर्यंत कर्ज सोय उपलब्ध आहे. मुदत पूर्व ठेव काढायची पण मुभा आहे. अधिक माहितीसाठी लोकमान्य मल्टिपर्पज को- ऑप. सोसायटीच्या नजीकच्या शाखेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सीकेटी महाविद्यालयात वाणिज्य संघटनेचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान (स्वायत्त) महाविद्यालयाच्या वाणिज्य संघटनेचे उद्घाटन शनिवारी (दि. ६) झाले. या वेळी प्रमुख पाहुणे संचालक (व्हीडीआयपीएल) अमोल यशवंत देशमुख उपस्थित होते, तसेच संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील, वाणिज्य शाखेचे प्रमुख डॉ. एस. बी. यादव, वाणिज्य विभागाच्या प्रमुख डॉ. एलीझाबेथ मॅथ्युज, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, लेखा आणि वित्त विभागाचे प्रमुख डॉ. एन. इ. कोळी यांनी उपस्थिती दर्शविली.





वाणिज्य विभागाच्या प्रमुख डॉ. एलीझाबेथ मॅथ्युज यांनी वाणिज्य संघटनेच्या उपक्रमांबद्दल आढावा घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी उपस्थितांना संबोधित करताना महाविद्यालयाच्या तथा वाणिज्य संघटनेच्या किर्तीचा मागोवा घेतला. अमोल देशमुख यांनी २०२२-२३ या वर्षासाठीचे कॉमर्स हेराल्ड प्रकाशित केले. यानंतर पोस्टर आणि मॉडेल मेकिंग स्पर्धेच्या विजेत्यांना आणि सहभागींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.




प्रमुख पाहुणे अमोल देशमुख यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकता या विषयावर मार्गदर्शन केले आणि त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांचे ध्येय निश्चित करण्यासाठी प्रेरित केले. संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी त्यांच्या संबोधनात वाणिज्य संघटनेचे महत्त्व सांगितले आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाणिज्य संघटनेच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीएमएस. विभाग प्रमुख मेनका नलावडे आणि प्रा. मिशेल जॅन्सी यांनी केले. लावण्या दासारी या विद्यार्थिनीने उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# मुंबईतील तलावांच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस

**मुंबई : प्रतिनिधी**

दोन दिवसांपासून पडणाऱ्या पावसामुळे मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या तलावांतील पाणीसाठ्यात चांगलीच वाढ झाली आहे. मोडक सागर, मध्य वैतरणा, भातसा आणि तुलसी धरणात १०० मिमीहून अधिक पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे सातही तलावांतील पाणीसाठा ९२ टक्क्यांच्या पुढे गेला आहे. गेल्या आठ दिवसांत एक लाख दशलक्ष लीटर पाणीसाठा वाढला आहे.



मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या उर्ध्व वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार, तुळशी या सात तलावांत सध्या ९२.६२ टक्के पाणीसाठा आहे. सातही तलावांमध्ये मिळून सध्या १३ लाख ४० हजार दशलक्ष लीटर पाणीसाठा आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे पाणी साठ्यात भरघोस वाढ झाली आहे, मात्र पावसाने विश्रांती घेतल्यामुळे पाणीपातळी वाढत नव्हती. बुधवारपासून पावसाने पुन्हा एकदा जोर धरला असल्याने तलावांतील पाणीसाठ्यात वाढ होऊ लागली आहे. दोन वर्षांच्या तुलनेत पाणीसाठा खूपच जास्त आहे. त्यामुळे अधिकारी वर्गासह नागरिकांनीही सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

**गेल्या २४ तासांत पश्चिम उपनगरात सर्वाधिक ५७.१ मिमी. पावसाची नोंद झाली. तर शहर भागात ३१.४९ मिमी., पूर्व उपनगरात ४९.६१ मिमी. पाऊस पडला.**

पान १ वरून



## कामोठ्यात मोफत आधार कार्ड शिबिर

गुजराती संघाचे अध्यक्ष आशिष पटेल, प्रभाग अध्यक्ष चंद्रकांत कडू, युवा मोर्चा उपाध्यक्ष तेजस जाधव, जयदीप कदम, महिला मोर्चा सरचिटणीस फातिमा आलम, युवा मोर्चा सरचिटणीस नवनाथ भोसले, रविशेठ जोशी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष जयेंद्र जोशी, सचिव आकाश कवडे, कामोठे शहर सरचिटणीस सुशील शर्मा, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तेजस जाधव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

मोफत आधार कार्ड शिबिर ८ ते ११ ऑगस्टदरम्यान सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू राहणार असून या शिबिरात नवीन कार्ड बनवणे, नाव बदलणे, मोबाईल क्रमांक लिंक करणे, जन्मतारीख बदलणे, बायोमेट्रिक, इमेल आयडी यांसारखे बदल आधार कार्डमध्ये करण्यात येणार आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## एकपात्री व द्विपात्री अभिनय स्पर्धा

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व स्पर्धांचे नियोजन केले जाते. एकांकिका स्पर्धेचा ब्रॅण्ड ॲम्बेसेडर ही संकल्पना पहिल्यांदा अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखेने 'अटल करंडक'मार्फत केली आणि कोकणचा कोहिनूर ओंकार भोजनेला बॅण्ड ॲम्बेसेडर बनवण्यात आले. कोरोना काळात नाट्यगृह बंद झाले, पण अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची जिद्द आणि योग्य नियोजनामुळे टाळेबंदी काळात यशस्वीरित्या स्पर्धा झाल्या.

एकपात्री अभिनय स्पर्धा पनवेल महानगरपालिका क्षेत्रापुरती मर्यादित असून वयोगट १२ ते १८ वर्ष आणि १९ व १९च्या पुढील असे आहेत. याकरिता प्रथम पारितोषिक पाच हजार रुपये व चषक, द्वितीय तीन हजार रु. व चषक, तृतीय दोन हजार रु. व चषक, उत्तेजनार्थ (एकूण दोन पारितोषिके) एक हजार रु. आहे.

द्विपात्री अभिनय स्पर्धा महाराष्ट्र राज्यपुरता मर्यादित असून तिचा गट खुला असणार आहे. यासाठी विषय हा विनोदी (कॉमेडी) आहे, तर प्रथम पारितोषिक १० हजार रु. व चषक, द्वितीय एक हजार रु. व चषक, तृतीय सात हजार रु. व चषक, उत्तेजनार्थ (एकूण दोन पारितोषिके) पाच हजार रु. आहे.

स्पर्धक आपला अभिनय मराठी किंवा हिंदी भाषेत सादरीकरण करू शकतात. जी भाषा निवडाल ती ८०% सादरीकरणामध्ये असावी. प्राथमिक फेरी ऑनलाइन, तर अंतिम फेरी प्रात्यक्षिक असेल. मंगळवार, १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत ऑनलाइन व्हिडीओ natyaparishad.panvelgmail.com या ई-मेल वर पाठवावा. एकपात्री स्पर्धेसाठी ५० रु. व द्विपात्री स्पर्धेसाठी १०० रु. प्रवेश फी असून ती भरल्यावरच प्रवेश पक्का केला जाईल. कुठल्याही परिस्थितीत एकदा भरलेली प्रवेश फी परत केली जाणार नाही. सादरीकरण करण्यासाठी एकपात्री करताना कमीत कमी ५ व जास्तीत जास्त ७ मिनिटांची आणि द्विपात्री करताना कमीत कमी ७ व जास्तीत जास्त १० मिनिटे वेळ असेल. सादरीकरण अश्लील अथवा प्रक्षोभक व सामाजिक तेढ निर्माण करणारे नसावे. वेशभूषा, केशभूषा, संगीत आवश्यक नाही. स्पर्धकांना ते आवश्यक वाटल्यास त्याची व्यवस्था स्पर्धकांनी करावी. कोणत्याही प्रकारचा खर्च स्पर्धकांना दिला जाणार नाही. अंतिम फेरीत प्रवेश मिळालेल्या स्पर्धकांनी आपल्या आधार कार्डची झेरॉक्स स्पर्धेच्या वेळी आणावी. अंतिम फेरीची तारीख २७ व २८ ऑगस्ट आहे. स्पर्धेविषयी अधिक माहितीसाठी गणेश जगताप (९८७०११६९६४) किंवा अमोल खेर (९८२०२३३३४९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सर्व रंगकर्मींना 'अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेची उत्सुकता असतेच. एकपात्री व द्विपात्री अभिनय स्पर्धेच्या अंतिम फेरी दिवशी अटल करंडक स्पर्धेची तारीख जाहीर केली जाणार आहे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३१

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणत्या सरकारी तेल कंपनीचे बाजारमूल्य सर्वात अधिक आहे?**
*अ.* इंडियन ऑईल *आ.* बीपीसीएल *इ.* ओएनजीसी *ई.* एचपीसीएल

**२. मोबाईल सेवा पुरविणारी भारतातील सर्वात मोठी कंपनी कोणती आहे?**
*अ.* जिओ *आ.* भारती एअरटेल
*इ.* व्होडाफोन आयडिया *ई.* टाटा टेलिकम्युनिकेशन

**३. भारतीय शेअर बाजारात सर्वाधिक बाजारमूल्य असलेली बँक कोणती?**
*अ.* एचडीएफसी बँक *आ.* आयसीआयसीआय बँक
*इ.* कोटक महिंद्रा बँक *ई.* स्टेट बँक ऑफ इंडिया

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# मच्छीमारांच्या हितासाठी भाजप प्रयत्नशील

## आमदार महेश बालदींनी घेतली केंद्रीय मंत्र्यांची भेट; समस्या दूर करण्याचे साकडे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्ससीन जाळ्याने मच्छीमारी करण्यासाठी शासनाने बंदी घातल्यामुळे मच्छीमारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे मच्छीमारांच्या हितासाठी सातत्याने प्रयत्न करणारे आमदार महेश बालदी यांनी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या नेतृत्वाखाली थेट केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री परषोत्तम रुपाला यांची सोमवारी (दि. ८) दिल्लीत भेट घेऊन पर्ससीन जाळ्याने मच्छीमारी करणाऱ्या मच्छीमारांच्या



समस्या मांडल्या आणि त्या अडचणी दूर करण्याची आग्रही मागणी केली.

पर्ससीन जाळ्याने मच्छीमारी करण्यासाठी शासनाने बंदी केल्याने मच्छीमार बांधवाना उदरनिर्वाह करण्यासाठी मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याबाबत राज्याच्या मागील विधिमंडळाच्या अधिवेशनात आमदार महेश बालदी यांनी आवाज उठवला होता. तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने मोघम उत्तर देत वेळ मारून नेली होती. त्यामुळे आमदार महेश बालदी यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू केला. राज्यात जवळपास ३० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेला कोळी समाज आपल्या उपजिविकेसाठी पारंपारिक मत्स्य व्यवसायावर अवलंबून आहे.

पर्ससीन जाळ्याने मच्छीमारी करण्यासाठी शासनाने बंदी घातल्यामुळे कोळी समाजाला आपल्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह करण्यासाठी अनेक समस्यांना सामोरे जावे लागल्याचे आमदार महेश बालदी यांनी केंद्रीय मत्स्यव्यवसाय मंत्री परषोत्तम रुपाला यांच्या निदर्शनास आणून दिले आणि मच्छीमारांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी या वेळी केली. त्यावर नामदार परषोत्तम यांनी सकारात्मक प्रतिसाद देत या संदर्भात विशेष लक्ष देणार असल्याचे विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, आमदार महेश बालदी यांना आश्वासित केले.

# ...तर सहकार चळवळ पुढे चालू राहील

- आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन
- कामोठ्यात अरिहंत बँकेचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न केले तर सहकार चळवळ पुढे चालू राहील, असे प्रतिपादन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामोठे येथे अरिहंत बँकेच्या उद्घाटनावेळी केले. खातेदारांचा विश्वासावर सार्थ ठरलेल्या श्री अरिहंत को-ऑरेटीव्ह बँकेची शाखा कामोठे येथे सुरू झाली आहे. अरिहंत बँकेची ही १वी शाखा असून, या शाखेचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. ७) उद्घाटन झाले.



या वेळी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, भाजप कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, युवा नेते हॅप्पी सिंग, भाजप भटके विमुक्त आघाडीच्या महिला जिल्हाध्यक्षा विद्या तामखडे, भुमीराज ग्रुपचे भुपेंद्र शहा, भीमेष मेहता, राजन सींग, विश्वनाथ झिंजाद, रोहित कुमार, मोहन निकम, दिनेश पटेल, मुकेश वर्मा, सुनील पाटील, भरत उटेकर, बँकेचे चेअरमन हिराचंद दांड, व्हाईस चेअरमन मुकेश मायशेरी, गुलाब शहा, सीइओ अशोक सावालकर, ब्रांच मॅनेजर संदीप खारमाले आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये गुरुपौर्णिमा उत्सव

## लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शारदा संगीत क्लासेस यांच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्सव २०२२ हा कार्यक्रम श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात शारदा संगीत क्लासेसच्या सर्व शिष्यगणांच्या वतीने गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून गुरुवर्य पंडित बाबादासजी तुपे आणि गुरुवर्य पंडित विष्णूबुवा सोळंके यांच्या पाद्यपूजनाचा सोहळा झाला. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली.

पनवेल मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक





विकास मंडळाच्या सभागृहात शारदा संगित क्लासेसच्या वतीने ‘गुरुपौर्णिमा उत्सव २०२२’ चे आयोजन रविवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमात गुरुवार्य हरिदासजी महाले आणि गुरुवर्य पंडीत विष्णूबुवा सोळुंके गुरुजी यांनी गायन सादर करण्यात आले. या वेळी भाजप महिला मोर्चाच्या पनवेल तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, महिला मोर्चा शहर अध्यक्षा वर्षा नाईक, पूनम ठाकूर, चंद्रप्रभा घरत, यांच्यासह शारदा संगीत क्लासेसचे सर्व शिष्यगण आणि रसिक उपस्थित होते. या कार्यक्रमात बाबादास तुपे गुरुजी, विष्णू बुवा सोळंकी गुरुजी, वैभव मंडलिक, ओम बोगांने, विनोद तोडेकर, सुप्रसिद्ध तबला वादक पंडित किशोरजी पांडे, वैभव कडू, पावन राजे, संतोष खरे, कुमार कौस्तुभ भाग्यवंत, किरण भोईर, ओवेष कदम, मंगेश साळुंखे, यांनी आपली कला सादर केली.

# ‘दिबां’ना सांस्कृतिक आदरांजली | नवी मुंबई विमानतळ नामकरण लढ्यातील मान्यवरांचा सत्कार

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

एकविरा कला संस्थेच्या वतीने प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील यांना सांस्कृतिक आदरांजली वाहण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. हा कार्यक्रम कामोठे येथील आगरी समाज मंगल कार्यालयात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी त्यांच्या हस्ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी ज्यांनी लढा दिला त्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे लोकनेते दि. बा. पाटील यांना आदरांजली



वाहण्याकरीता एकविरा कला संस्थेचे तेजस पाटील यांच्या माध्यमातून कामोठे येथील आगरी समाज कार्यालयात माऊली मित्र मंडळ आणि रिक्षा चालक मालक संघटनेच्या सहकार्याने सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात जे. डी तांडेल, पनवेल महापालिकेचे माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, चारुशीला घरत, महिला व बालकल्याण समितीच्या माजी सभापती कुसुम म्हात्रे, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकवाड, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, युवा नेते हॅप्पी सिंग, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, शंकर म्हात्रे आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तेजस पाटील हे कलेच्या माध्यमातून समाजसेवेचे काम करत असल्याचे प्रतिपादन करून ह्या सांस्कृतीक कार्यक्रमातून लोकनेते दि. बा. पाटील यांना आदराजंली वाहण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

# सीकेटी संकुलात नूतन उपहारगृह सुरू | माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) संकुलात नूतनीकरण झालेल्या उपहारगृहाचे उद्घाटन सोमवारी (दि. ८) पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, समीर ठाकूर हे उपस्थित होते. प्रमुख अतिथी परेश ठाकूर यांनी या वेळी उपगृहाचे संचालक दिनेश बहिरा यांना





उपहारगृहात योग्य त्या स्वच्छतेची काळजी घ्या आणि खाद्यपदार्थांच्या दर्जाबाबत कधीही तडजोड करू नका, अशा सूचना केल्या.

या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, तसेच सीकेटी शैक्षणिक संकुलातील सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.



**खारघर :** भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सेक्टर १५ प्लॉट नंबर ४७ येथील मिलेनियम एम्पायरमध्ये अल्फा वन या हॉस्पिटलचे उद्घाटन रविवारी झाले. या वेळी पनवेल महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, डॉ. अमोल चौधरी, डॉ. खिलचंद भंगाले, डॉ. पल्लवी चौधरी, डॉ. सोनल भंगाले, डॉ. सुनील चौधरी, सुनंदा चौधरी, दिलीप भंगाले, जयश्री भंगाले, विकास भंगाले आदी उपस्थित होते.



**कामोठे :** माजी नगरसेवक विजय चिपळेकर यांच्या नगरसेवक निधीमधून बेंचेसचे वाटप करण्यात आले. सेक्टर १५ स्मशानभूमी, सेक्टर १० कोहिनूर सोसायटी, बॅनझर सोसायटी, सेक्टर ३६ नंदनवन सोसायटी, शिवसेना शाखेच्या कॉर्नरजवळ, सेक्टर ६ त्रिमुर्ती कॉर्नर, एमएनआर स्कूल, सेक्टर ७ अजिंक्यतारा कॉर्नर, सेक्टर ३५ पुरातन श्री गणेश मंदिर या ठिकाणी बेंचेस बसवण्यात येत आहेत. या वेळी भाजप शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नतेकर, नवनाथ भोसले आदी उपस्थित होते.

# श्री नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्टचे उपक्रम कौतुकास्पद -परेश ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्टचे शैक्षणिक उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी येथे केले.

पनवेल शहरातील श्री नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे पनवेल महापालिका हद्दीतील १० शाळांतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप पनवेल येथील श्री साईबाबा मंदिर येथे करण्यात आले. त्या वेळी परेश ठाकूर बोलत होते. या कार्यक्रमास माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, श्री नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष खेमचंद गोपलाणी, सेक्रेटरी रामलाल चौधरी, उपाध्यक्ष राम थदानी उपस्थित होते.

पुढे बोलताना परेश ठाकूर म्हणाले की, सामाजिक बांधिलकी म्हणून अखंडपणे हा शैक्षणिक उपक्रम राबविला जात आहे. या शैक्षणिक साहित्यातून विद्यार्थ्यांनी मनापासून मोठे व्हावे. हा शैक्षणिक उपक्रम राबवून समाजाला सोबत घेऊन जाण्याचे काम श्री नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्ट करत असून ही पनवेलकरांसाठी अभिमानाची गोष्ट असल्याचेही त्यांनी नमूद केले.

श्री साईबाबा मंदिर पनवेल येथे पनवेल शहर, कोळेश्वर विद्या मंदिर, मोठा खांदा, धाकटा खांदा, तक्का, पोदी, गुजराती, उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी १० शाळांतील शिक्षकांचाही सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे या शिक्षकांना शिर्डी यात्रेचेही आयोजन श्री नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे, अशी माहिती श्री नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्टचे सेक्रेटरी रामलाल चौधरी, उपाध्यक्ष राम थदानी यांनी दिली.

# रायगड विज्ञान अध्यापक मंडळाच्या अध्यक्षपदी अनिल पाटील यांची निवड



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा गणित विज्ञान अध्यापक मंडळातर्फे रायगड जिल्ह्याच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यामधील विद्यार्थी व शिक्षकांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. रविवारी (दि. ७) कोलाड येथे मंडळाची नवीन कार्यकारणी तयार करण्याची सहविचार सभा झाली. यामध्ये रायगड गणित विज्ञान अध्यापक मंडळातर्फे सर्वानुमते अनिल पाटील यांची रायगड विज्ञान अध्यापक मंडळ अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

अनिल पाटील हे पनवेल तालुक्यातील गुळसुंदे गावचे रहिवासी असून रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल कामोठे येथे उपशिक्षक पदावर कार्यरत आहेत. जिल्ह्यात त्यांची उपक्रमशील शिक्षक म्हणून ओळख आहे. रायगड जिल्ह्यातील राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद, इन्स्पायर अवॉर्ड योजना, गणित संबोध परीक्षा, स्कॉलरशिप परीक्षा, शिक्षकांसाठी विविध प्रशिक्षणामध्ये त्यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन आहे.

अनिल पाटील यांना रयत शिक्षण संस्थेचा रायगड आदर्श विज्ञान शिक्षक पुरस्कार तसेच वोडाफोन आयडिया टीचर अवार्ड तर्फे एक लाखाची स्कॉलरशिप मिळाली आहे. अशा उपक्रमशील शिक्षकाची रायगड विज्ञान अध्यापक मंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सर्व तालुक्यातून व जिल्ह्यातून त्यांचे कौतुक होत आहे. या कार्यक्रमाच्या वेळी मंडळाचे पदाधिकारी एस. एस. पाटील, ए. सी. चिनके, एम. एम. तांबे, जे. के. कुंभार, एस. बी. शिंदे आणि विविध तालुक्यांचे अध्यक्ष व तालुका प्रतिनिधी उपस्थित होते.

# गव्हाण विद्यालयात क्रांती मशाल प्रज्वलित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाची आहुती देणाऱ्या क्रांतिवीरांना अभिवादन करून रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये क्रांती मशाल प्रज्वलित करण्यात आली.



विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांच्या हस्ते क्रांती मशाल प्रज्वलित करण्यात आली. प्रारंभी डोईफोडे व पर्यवेक्षक दीपक भर्णुके आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर व उपशिक्षक सागर रंधवे यांच्या हस्ते महान देशभक्तांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. आता नववी ’क’ या वर्गाचे वर्गशिक्षक प्रसन्न ठाकूर यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले.

सांस्कृतिक विभागाच्या सहायक हर्षला पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. ९ ऑगस्ट रोजी विद्यालयास सुटी असल्यामुळे ऑगस्ट क्रांती दिनाच्या आदल्या दिवशी झालेल्या या कार्यक्रमास क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, वर्गशिक्षक प्रसन्न ठाकूर, सेवक डी. आर. ठाकूर आप्पा, दयानंद खारकर, अरुण मामा कोळी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## संपादकीय

# असंवेदनशीलतेचे आव्हान

गोंदिया बलात्कार प्रकरणाने वृत्तपत्रांमध्ये पहिल्या पानावर हेडलाइनची जागा पटकावली असली तरी अशा घटना या अलीकडे समाजाकडून मात्र एक प्रकारच्या निर्विकारपणेच स्वीकारल्या जाताना दिसतात. अमानुष लैंगिक अत्याचाराची अशी एखादी घटना कुठे आणि कुणाच्या संदर्भात घडली आहे यावरून जनसामान्यांची प्रतिक्रिया किती तीव्र असेल ते ठरते. अन्यथा काही राजकीय पक्षांकडून निव्वळ राजकारणात भांडवल करण्याचा एक मुद्दा म्हणूनच अशा दुर्दैवी घटनांचा वापर होताना दिसतो.

गोंदिया बलात्कार प्रकरणातील अवघा घटनाक्रम यापूर्वी आपल्या देशात ग्रामीण अथवा दुर्गम भागात कित्येक ठिकाणी घडून गेलेल्या व अधूनमधून कानावर येणाऱ्या कुठल्याही बलात्कार प्रकरणासारखाच आहे. घरगुती वादातून गोंदिया जिल्ह्यातील ही महिला अवेळी एकटीच माहेरी जाण्यासाठी घराबाहेर पडली आणि अमानुष अत्याचारांची मालिकाच दुर्दैवाने तिच्या नशिबी आली असे आता उघड होत चाललेल्या माहितीतून समोर येते आहे. एरव्ही सर्वसामान्य म्हणून वावरणाऱ्या काही पुरुषांमधला नराधम एकटीदुकटी असहाय्य स्त्री दिसली की कसा जागा होतो ते याही प्रकरणातून पुरते स्पष्ट दिसते. आपल्याकडचे बहुसंख्य बलात्कार हे ओळखीच्याच पुरुषांकडून केले जातात हे वास्तव याही प्रकरणात अधोरेखित होते. माहेरी सोडण्याची भूलथाप देऊन ओळखीच्याच एका इसमाने तिला भलत्याच गावी नेऊन तिच्यावर सर्वप्रथम अत्याचार केले. त्याने तिला जीवे मारण्याची अमानुषता थेट दाखवली नसली, तरी तिला जंगलात एकटे सोडून जाण्यामागे हेतू मात्र तोच असावा. अत्याचाराने सुन्न झालेली ही महिला जंगलातून वाट काढून कशीबशी मुख्य रस्त्यावर पोहोचली आणि कुणा महिला पोलिसाने तिला एकटेच हिंडताना पाहून ती सुरक्षित पोलिस ठाण्यात पोहोचेल याची खबरदारीही घेतली. पण त्या महिला पोलिसाने दाखवलेली संवेदनशीलता ही विरळाच ठरली. पीडितेच्या नशिबीचा दुर्दैवाचा फेरा त्यानंतरही थांबला नाही. आपल्या देशातील बहुतांश बलात्कार प्रकरणांमध्ये ठळकपणे सामोरी येणारी पोलिसांची पीडित महिलेविषयीची नेहमीची कमालीची असंवेदनशीलता त्यानंतर मात्र तिच्याही वाट्याला आली. लाखनी पोलीस ठाण्यातून ही महिला स्वत:च निघून गेल्याचा दावा तेथील पोलिसांकडून आता केला जातो आहे. अत्याचारामुळे बधिरावस्थेत असलेल्या या निराधार महिलेची नीट विचारपूस करण्याची दक्षता या पोलिसांनी न घेतल्यामुळेच ती पुन्हा एकदा नराधमांच्या तावडीत सापडली. तिच्यावर आणखी दोघांनी त्यानंतर बलात्कार केल्याची माहिती आता समोर आली आहे. संबंधित पीडिता पोलिसांची नजर चुकवून पोलिस ठाण्यातून निघून गेल्याचा दावा पोलीस आता करीत असले तरी त्यातून त्यांची बेफिकीरीच उघड होते. सलग दोन दिवस अत्याचारांचा सामना केलेल्या या महिलेची प्रकृती आता गंभीर असल्याने राजकीय लाभापोटी विरोधकांकडून आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. हा अवघा घटनाक्रम महिलांसाठी असुरक्षित मानल्या जाणाऱ्या उत्तर भारतातील काही राज्यांमध्ये असंख्य बलात्कार प्रकरणांमध्ये असतो तसाच आहे. पण याखेपेला हे दुर्दैवी प्रकरण महाराष्ट्रात घडले आहे. यानिमित्ताने नेहमीचेच, आणखी किती निर्भया वगैरे प्रश्न विचारले जातील. राजकीय पोळी भाजून घेण्याकरिता याही प्रकरणाचा वापर होईल आणि कालांतराने हेही प्रकरण निव्वळ गुन्हेगारीच्या वार्षिक आकडेवारीत जमा होईल. दुर्गम, ग्रामीण भागातील असहाय्य, पीडित महिलांना रात्रीच्या वेळी पोलिसांनी कशाप्रकारे सुरक्षितता पुरवावी याचे स्पष्ट निर्देश यानिमित्ताने किमान पुन्हा अधोरेखित व्हावेत. त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकरिता पोलिसांना पुरेसे संवेदनशील करण्याचे आव्हान मात्र खूपच मोठे आहे.

# महाडमध्ये भंगार गोदामांकडून नियमांचे उल्लंघन



बेकायदेशीर भंगार गोदामांकडून शासनाच्या सर्वच नियमांचे उल्लंघन राजरोसपणे केले जात आहे. याकडे संबंधित विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. महाड शहरातील तसेच औद्योगिक क्षेत्रातील भंगार व्यावसायिक अनधिकृतपणे जुन्या वाहनांची तोड करत असून याठिकाणी काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेबाबत देखील विचार केला जात नसल्याचे दिसून येत आहे. भंगार गोळा करण्यातून अनेकांचा उदरनिर्वाह चालत आहे. गोरगरिबांच्या जीवावर काही भंगार व्यावसायिक मात्र गलेलठ्ठ झाले आहेत. या भंगार व्यावसायिकांकडून अनधिकृतपणे वाहनांची तोडकाम करणे, रासायनिक कचरा घेणे, घरगुती सिलिंडर वापर करणे, आदी कामे बिनदिक्कत केली जात आहेत. परप्रांतीय असलेल्या या भंगार व्यावसायिकांकडून कामगारांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष केले जाते. उत्तर प्रदेश, बिहार आदी राज्यातून भंगार व्यावसायिक आणि कामगार याठिकाणी आपला तळ ठोकून आहेत. औद्योगिक क्षेत्र तसेच महाड शहरात या व्यावसायिकांनी काहींच्या आशीर्वादातून जागा भाडे तत्वावर घेवून व्यवसाय उभे केले आहेत. मात्र याठिकाणी कोणतीच खबरदारी घेतली जात नसून संबंधित शासकीय अधिकारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून आहेत.

महाड शहरात किमान सहा ते सात तर तालुक्यात पंधरा वीस भंगाराचे गोदामे आहेत. शहरात प्रवेश करणाऱ्या प्रमुख मार्गावर हे व्यावसायिक असून या गोदामांवर शहर तसेच ग्रामीण भागातून गोळा करून आणलेले भंगार स्वीकारले जाते. बहुतांश परप्रांतीय नागरिक या व्यवसायात असून ग्रामीण भागात भंगार घेवून आईस्क्रीम, भांडी, कपडे दिले जातात तर शहरात रोख रक्कम देवून भंगार खरेदी केले जाते.



या भंगार व्यावसायिकांकडून गोळा करून आणणाऱ्या व्यक्तीकडून कमी पैशात भंगार घेवून विक्री मात्र बाजारभावाप्रमाणे केली जात असल्याने सर्वसामान्य, गोरगरिबांच्या पोटावर भंगार व्यावसायिक मात्र गलेलठ्ठ झाले आहेत. ज्या भाड्याच्या जागेत ही गोदामे आहेत त्या ठिकाणी इमारत नसताना देखील आणि कागदपत्रांचा पत्ता नसताना देखील वीज पुरवठा करण्यात आला आहे. हा वीज पुरवठा करताना देखील

### खबरबात
**महेश शिंदे**

महावितरणकडून लाकडी काठ्यांचा आधार देत वीज पुरवठा दिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

शिवाय स्थानिक प्रशासनाकडून देखील विचारणा होत नसल्याने भंगार गोदामांवर पाणी पुरवठादेखील केला गेला आहे. सर्वसामान्य माणसाला कामे करताना शासकीय नियमांची आडकाठी समोर येते. मात्र या भंगार व्यावसायिकांना कशा परवानग्या आणि सोयीसुविधा दिल्या, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

महाड शहरात असलेल्या प्रमुख मार्गांच्या शेजारीच भंगार गोदामे आहेत. या भंगार गोदामांवर आणि परिसरात अस्वच्छ वातावरण आहे. जागोजागी पडलेले भंगाराचे तुकडे, ड्रम, जुन्या टाक्या आदींमुळे ऐन पावसाळ्यात पाणी साचून डेंग्यूचा प्रसार होण्यास मदत होते. एकीकडे महाड नगरपालिका आरोग्य विभाग सर्वसामान्य नागरिकांला घरात किंवा घराशेजारी ठेवलेल्या कुंडीत अगर ड्रममध्ये पाणी साचून ठेवल्यास कारवाई केली जाते. मात्र भंगार गोदामांवर ऐन पावसाळ्यात साचलेल्या पाण्याबाबत आणि गलिच्छ वातावरणावर कोणतीच कारवाई केली जात नाही. याच ठिकाणी भंगार गोदामांवर काम करणारे कामगारदेखील राहतात. औद्योगिक क्षेत्रात तर रासानिक ड्रम, रासायनिक पावडरच्या पिशव्या, साठवून ठेवल्या जातात. या पिशव्या किंवा ड्रम हे कामगार असुरक्षितपणे बाळगतात. यामुळे यापूर्वी अनेक अपघातदेखील झाले आहेत.

परिसरात यामुळे रसायन सांडून जमिनीची सुपिकता आणि शेती धोक्यात असताना देखील जागा मालकाशी करार करून कोणत्याच प्रकारची शासकीय परवानगी न घेता या भंगार व्यावसायिकांनी तळ ठोकले आहेत.

भंगार गोदामांवर अनधिकृतपणे वाहनांची तोड होत असते. बहुतांश भंगार व्यावसायिकांकडून जुनी वाहने भंगार म्हणून घेतली जातात. परिवहन विभागाची रीतसर परवानगी न घेताच वाहन मालकदेखील आपली वाहने भंगार व्यावसायिकांना देतात. भंगार व्यावसायिकदेखील परिवहन विभागाच्या कोणत्याच परवानग्या न काढता आपल्या कामगारांकडून वाहन तोडून नष्ट करतात. जुने वाहन नष्ट झाले असले तरी संबंधित विभागाकडे मात्र या वाहनांची नोंद कायम राहते. किंवा या नंबर प्लेटचा वापरदेखील केला जाण्याची शक्यता असते. प्रत्येक महिन्याला शहरात परिवहन विभागाचा कॅम्प असून देखील आर.टी.ओ.कडून याबाबत दुर्लक्ष केले जाते. भंगार व्यावसायिकांकडून होत असलेल्या अनधिकृत कामांची तपासणी करून कारवाई होणे आवश्यक आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# जीमेलवर चुकून मेल सेंड झाला? असा करा अनसेंड

आपण एका दिवसात अनेक लोकांना ईमेल पाठवतो. विशेषत: जर तुम्ही कॉर्पोरेट ऑफिसमध्ये काम करत असाल, तर तुम्ही जीमेल आणि आऊटलूकद्वारे दररोज भरपूर लोकांना ईमेल पाठवता. कधीकधी असे होते की, आपण एखाद्याला चुकीचा ईमेल पाठवतो किंवा




ईमेल पाठविल्यानंतर आपला विचार बदलतो. मात्र यानंतर जर तुम्हाला तो ईमेल अनसेंड करायचा असेल, तर अशावेळी जीमेलचे खास अनसेंड फीचर वापरू शकता. खूप कमी लोकांना माहित आहे की, जीमेल आपल्या वापरकर्त्यांना त्यांनी चुकून पाठवलेले ईमेल अनसेंड करण्याची परवानगी देते. म्हणून आज आपण जीमेलवर ईमेल कसा अनसेंड करायचा हे जाणून घेणार आहोत. ईमेल पाठविल्यानंतर तुम्हाला मेल अनसेंड करण्यासाठी थोडा वेळ मिळतो हे लक्षात घेण्यासारखे आहे. जेव्हा तुम्ही एखादा ईमेल पाठवता तेव्हा तुम्हाला मेल पाठवण्याचा पर्याय दिसला असेल. तेथे व्ह्यू मेसेजबरोबरच अनडूचाही पर्याय आहे. तुमचा इमेल अनसेंड करण्यासाठी तुम्हाला अनडूवर क्लिक करावे लागेल. याशिवाय यूजर्स त्यांना हवे असल्यास कोणताही मेसेज रिकॉल करण्याची वेळदेखील निवडू शकतात.

यासाठी जीमेल अकाउंटमध्ये लॉग इन करा आणि वरच्या उजव्या कोपऱ्यात सेटिंग्जवर जा. येथे तुम्हाला 'सी ऑल सेटिंग्ज'चा पर्याय मिळेल. तेथे क्लिक करा. आता अनडू सेंड फिचरवर टॅप करा आणि सेंड कॅन्सलेशन पिरियड निवडा. येथे तुम्हाला चार पर्याय मिळतील. या पर्यायांपैकी एकावर क्लिक करा आणि नंतर खाली स्क्रोल करा. आता तुम्हाला सेव्हवर क्लिक करावे लागेल. हे लक्षात घ्या की, हा अनसेंड करण्याचा कालावधी जीमेल मोबाइल ॲपवर पाच सेकंदांवर सेट केला आहे. ते बदलता येत नाही. आता जेव्हाही तुम्ही हा इमेल पुन्हा पाठवाल, तेव्हा तुम्हाला तुमच्या स्क्रीनच्या डाव्या बाजूला एक पर्याय दिसेल, ज्यामध्ये पाठविलेला पहिला संदेश लिहिलेला असेल. डेस्कटॉपवरील जीमेल वापरकर्त्यांना डेस्कटॉपवर स्क्रीनच्या तळाशी डाव्या बाजूला आणि मोबाइलवर तळाशी उजवीकडे ब्लॅक बॉक्समध्ये अनडू लिंक दिसेल. एकदा ईमेल अनसेंड केल्यानंतर, तुम्ही तो मेल पुन्हा पाठवण्यापूर्वी एडिट करू शकता किंवा त्यात बदल करू शकता.

# ऑगस्ट क्रांती दिन : स्वातंत्र्याची पहाट

सन १९४२चा अखेरचा लढा देण्याचे महात्मा गांधींनी ठरविले. ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गोवालिया टँक मैदानावर (ऑगस्ट क्रांती मैदान) झालेल्या ऐतिहासिक अधिवेशनात गांधीजींनी ब्रिटिश सत्तेला चले जावचा इशारा दिला. 'लढेंगे या मरेंगे' ची घोषणा झाली आणि बघता बघता सारा देश पेटून उठला.




क्रांतीची धगधगती मशाल हातात घेऊन देशात स्वातंत्र्याचा प्रकाश आणण्यासाठी ज्या हजारो हुतात्म्यांनी आपल्या प्राणाची पर्वा न करता आहुती दिली अशा अमर हुतात्म्यांचा स्मृतीदिन 'ऑगस्ट क्रांती दिन' म्हणून ओळखला जातो. ९ ऑगस्ट १९४२ रोजी देशाचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी 'छोडो भारत' आंदोलनाची गर्जना केली होती. गांधीजींचा 'करेंगे या मरेंगे' हा मंत्र देशातील हजारो तरुणांच्या नसानसात भिनला होता. स्वातंत्र्य संग्रामातला हा शेवटचा 'करो या मरो' चा लढा मानला जातो. इंग्रजांनी देशाला स्वातंत्र्य देऊन चालते व्हावे यासाठी गांधीजींनी 'चले जाव' चा नारा दिला. गांधीजींच्या आदेशाप्रमाणे प्रत्येकजण झटला होता.

९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गोवालिया टँक येथील अधिवेशनात महात्मा गांधी यांनी 'छोडो भारत' आंदोलनाची हाक दिली. या आंदोलनातून ब्रिटिशांना भारत सोडून जाण्याचा निर्वाणीचा इशारा देण्यात आला होता. या आंदोलनाची सुरुवात गोवालिया टँक म्हणजे आजच्या ऑगस्ट क्रांती मैदानातून झाली आणि नंतर या आंदोलनाचा भडका संपूर्ण देशभरात पसरला. इंग्रजी सत्तेविरुद्ध संपूर्ण देश पेटून उठला. धर्म, जात, वंश इत्यादी बाबी बाजूला सारत लाखो लोक या जनआंदोलनात सामील झाले. इंग्रजांना परिस्थिती हाताळताना नाकी नऊ आले.

इंग्रजांनी इतक्या लोकांना अटक केले की, जेलमध्ये जागाच शिल्लक राहिली नाही. इंग्रज कोणत्याही व्यक्तीला अटक करून कुटूंबात डांबत होते. या आंदोलनात लोकांनी पोलीस ठाणेदेखील नेस्तनाबूत केले. टेलिफोन सुविधा बंद केल्या. त्यामुळे भांबवलेल्या ब्रिटिश सरकारने आंदोलकांवर गोळीबार सुरू करण्याचा आदेश दिला.

मात्र लोकांनी ब्रिटिशांच्या गोळीबाराला, लाठी हल्ल्याला न घाबरता आंदोलन सुरु ठेवले. ब्रिटिशांनी या प्रकरणी महात्मा गांधी आणि अन्य नेत्यांना अटक केली. ब्रिटिशांनी महात्मा गांधी आणि त्यांच्या कुटुंबियांची रवानगी पुण्यातील गुप्त ठिकाणी केली. त्याचबरोबर इतर नेतेमंडळींनाही गुप्त जागी ठेवण्यात आले, परंतु ही बातमी फुटली. नेतेमंडळींना अटक झाल्यानंतर हे आंदोलन लोकांच्या ताब्यात गेले. लोकांनी ब्रिटिश सरकारविरोधात प्रचंड हिंसक आंदोलने केले. ब्रिटिशांनी सर्वच आंदोलकांना ताब्यात घेत परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न केला. या आंदोलनामुळे जरी प्रचंड उद्रेक झाला असला तरी स्वातंत्र्याची पहाट या जनआंदोलनामुळेच उगवली हे विसरता येणार नाही.

भारताच्या इतिहासातील हा महत्त्वाचा दिवस लक्षात ठेवण्यासाठी ऑगस्ट क्रांती दिवसाच्या ५०व्या वर्धापन दिनी भारतीय रेल्वेने मुंबई ते नवी दिल्ली या मार्गावर एसी एक्स्प्रेस ट्रेन सुरू केली. या ट्रेनला ऑगस्ट क्रांती राजधानी एक्स्प्रेस असे नाव देण्यात आले. दरम्यान, क्रांतीची धगधगती मशाल हातात घेऊन देशात स्वातंत्र्याचा प्रकाश आणण्यासाठी ज्या हजारो हुतात्म्यांनी आपल्या प्राणाची पर्वा केली नाही. अशा या क्रांतीदिनाची माहिती आजच्या तरुण पिढीसमोर येणे गरजेचे आहे.

### क्लिक...क्लिक...!



**नवी मुंबई : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत कार्यक्रमांचे नियोजन सुरू आहे. देशातील जनतेच्या प्रतिसादामुळे हा राष्ट्रभक्तीचा उत्सव ठरला आहे. नवी मुंबई पालिकाही या कार्यक्रमांसाठी सज्ज झाली आहे. पालिकेच्या विविध विभागांकडून अमृत महोत्सवानिमित्त निरनिराळे उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत पालिकेच्या वाहन विभागातील चालकांनी ७५ अंकात वाहने उभी करून अशी अनोखी मानवंदना दिली.** (छाया : सिद्धेश प्रधान)

## आरोग्य प्रहर

# जेवणानंतर चालणे आरोग्यास उपयुक्त; जाणून घ्या माहिती...

जेवल्यानंतर तासभर चालल्याने अधिक लाभ होतो. त्यामुळे या काळात रक्तशर्करा वाढण्याची जास्त झालेली शक्यता कमी होते. तसेच जेवणानंतर केलेल्या



शतपावलीने रक्तशर्करा कमी होण्यास मदत होते, असे एका अभ्यासादरम्यान निदर्शनास आले. एरवी जेवणानंतर चांगले पचन होण्यासाठी शतपावलीचा उपयोग होतो, अशी सर्वसाधारण धारणा आहे. मात्र, आता संशोधकांच्याही निदर्शनास आले आहे, की कोणत्याही जेवणानंतर थोडे चालल्यानंतर रक्तशर्करेचा स्तर घटतो. त्यामुळे 'टाईप दोन' स्तराच्या मधुमेहाने होणारे त्रास कमी होण्यास मदत होते. जेवल्यानंतर तासभर चालल्याचा अधिक लाभ होतो. अलिकडेच एका वृत्तानुसार 'जर्नल स्पोर्ट्स मेडिसिन'च्या अहवालात बसण्याचे, उभे राहण्याचे आणि चालण्याचे हृदयासह 'इन्शुलिन', रक्तशर्करेचा स्तर आदींवर होणाऱ्या परिणामांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. त्यात असे निदर्शनास आले, की जेवल्यानंतर थोडे चालणे दोन ते पाच मिनिटांपर्यंत वाढवत नेल्यास रक्तशर्करा पातळी नियंत्रित होण्यास लक्षणीय मदत होते. भारतीयांना याचे निष्कर्ष फायदेशीर ठरतील, असे तज्ज्ञांचे मत आहे. मुळात भारतीयांची जेवणाच्या सवयी व आहार घटक पाहता जेवणानंतर रक्तशर्करा मोठ्या प्रमाणावर वाढून, त्यावर नियंत्रण मिळविणे कठीण जाते. मात्र, ज्या व्यक्तींना हृदयविकार आहे, त्यांनी जेवणानंतर चालण्याचा निर्णय वैद्यकीय सल्ल्याने घ्यावा. कारण त्यामुळे हृदयावरील ताण वाढण्याची शक्यता असते. याआधी २०११ व २०१६मध्ये या संदर्भात करण्यात आलेल्या अभ्यासाच्या निष्कर्षांना नव्या संशोधनामुळे दुजोरा मिळतो. या अहवालात घरकामे करण्याचीही शिफारस करण्यात आली आहे. त्यामुळे होणाऱ्या शारीरिक हालचालींसह दिवसभरात शक्यतो इतर हालचाली कराव्यात. या अल्प शारीरिक क्रियांमुळे व आहारातील योग्य बदलाने रक्तशर्करेचा स्तर नियंत्रित करण्यास मदत होते. कामाच्या ठिकाणी जास्त वेळ बसावे लागत असेल, त्यांनी असे जेवणानंतर थोडे चालत राहावे. त्यामुळे जिममध्ये 'ट्रेडमिल'वर कठोर मेहनत घेऊन धावण्याच्या तुलनेत हा दोन-पाच मिनिटांचा 'मिनी-वॉक' अधिक व्यावहारिक आहे, असे या नव्या अभ्यासाचा निष्कर्ष सांगतो.

# स्वातंत्र्याची दिंडी उपक्रमाचा रायगडात शुभारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याला १५ ऑगस्ट रोजी ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त रायगड जिल्हा परिषदेमार्फत जिल्ह्यात स्वातंत्र्याची दिंडी उपक्रम राबविण्यात येत असून, त्यानिमित्त विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाचा प्रारंभ सोमवारी (दि. ८) वरसोली येथे रॅली काढून करण्यात आला.

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या संकल्पनेतून स्वातंत्र्याची दिंडी हा उपक्रम राबविण्यात येत असून, जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले यांच्या उपस्थितीत वरसोली येथील रॅलीला हिरवा झेंडा दाखिण्यात आला.

वरसोली ग्रामपंचायत कार्यालयापासून रॅलीला सुरुवात होऊन गावातील विठ्ठल रखुमाई मंदिरात सांगता करण्यात आली. रॅलीत भारतमातेची दिंडी काढण्यासोबत विद्यार्थ्यांनी भारतमाता तसेच शिवाजी महाराजांची वेशभूषा केली होती. रॅलीत देशभक्तीपर गीते सादर करण्यात आली. पथनाट्याच्या माध्यमातून हर घर तिरंगा अभियानाबाबत जनजागृती करण्यात आली. या वेळी पर्यावरण संवर्धनाबाबत उपस्थितांना शपथ देण्यात आली.

जिल्हा परिषदेचे महिला व बालकल्याण विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मंडलिक, माध्यमिक विभाग शिक्षण अधिकारी जोत्स्ना शिंदे-पवार, केंद्रीय संचार ब्युरो भारत सरकार अहमदनगर प्रतिनिधी फनीकुमार पी., जिल्हा क्रीडा अधिकारी सचिन निकम, नेहरू युवा केंद्र जिल्हा समन्वयक निशांत रौतेला, अलिबाग गटविस्तार अधिकारी ज्ञानेश्वर साळावकर, वरसोली सरपंच प्रमिला भाटकर, निवृत्त कॅप्टन उमेश वाणी, स्वातंत्र्यसैनिक अमरनाथ राणे, दामोदर पडवळ, जयवंत गायकवाड, मिलिंद कवळे, तपस्वी गोंधळी यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, नागरिक या रॅलीत सहभागी झाले होते.




**स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या बलिदानाचे स्मरण करून देशातील नागरिकांमध्ये देशभावना जागृत करण्याचा प्रयत्न स्वातंत्र्याची दिंडी उपक्रमातून करण्यात येत आहे. १३ ते १५ ऑगस्टदरम्यान सर्वांनी घरोघरी तिरंगा फडकावून देशाभिमान जपावा. प्रत्येक नागरिकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करावे.**
**– निलेश घुले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सामान्य प्रशासन**

### जिल्हाभर रॅलींचे आयोजन

रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या सहकार्याने वरसोली येथे रॅली काढून स्वातंत्र्याची दिंडी कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यानिमित्त वरसोलीसह जिल्ह्यातील विविध ७५ गावांमध्ये ७५ रॅलींचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व रॅलींना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.


(छाया : सलीम शेख)

# माणगावमध्ये स्वातंत्र्याची अमृत महोत्सवी दौड

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील आणि पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि. ८) अमृत महोत्सवी दौड व प्रभात फेरी काढण्यात आली होती.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या अभियानांतर्गत हर घर तिरंगा उपक्रम देशभर राबविण्यात येणार असून हे अभियान माणगावात १३ते १५ऑगस्ट दरम्यान यशस्वीपणे राबविण्यासाठी माणगावकर सज्ज झाले आहेत. माणगाव नगरपंचायत पाठोपाठ माणगाव पोलीस ठाण्यातर्फे याबाबतीत जनजागृती करण्यासाठी सोमवारी अमृत महोत्सवी दौड व प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. माणगाव प्रांत कार्यालय परिसरात नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या हस्ते या दौड व प्रभात फेरीचा शुभारंभ करण्यात आला.

प्रांत कार्यालय येथून काढण्यात आलेली ही जनजागृती दौड व प्रभातफेरी मुंबई-गोवा महामार्ग, मोर्बा रोड मार्ग, नवीन बसस्थानक, निजामपूर रोड, कालवा रोड मार्गे पुन्हा प्रांत कार्यालयात आली. तळा पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्री. ओमासे, गोरेगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्री. नावले यांच्यासह रायगड पोलीस दल, एनसीसी पथक गोरेगाव, रायगड पोलीस दलाचे बँड पथक, अशोकदादा साबळे विद्यालयाचे विद्यार्थी, छत्रपती करिअर अकॅडमी आर्मी व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्राचे विद्यार्थी, शिक्षक, लोकप्रतिनिधी, नागरिक या दौड व प्रभात फेरीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# द्रुतगती मार्गावर चार वाहनांचा अपघात

## ट्रकचालक जागीच ठार, सात जण जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर आडोशी गावाच्या हद्दीत सोमवारी (दि. ८) सकाळी चार वाहनांचा अपघात झाला. त्यात ट्रक चालकाचा जागीच मृत्यू झाला तर अन्य वाहनांतील सात प्रवासी जखमी झाले. ट्रकमधील दोघाजणांनी प्रसंगावधान राखत उडी मारल्याने त्यांचा जीव वाचला आहे.

द्रुतगती मार्गावरून पुणे येथून तळोजाकडे जाणाऱ्या ट्रक (एमएच-४४,यु-०११९) चे आडोशी गावाच्या हद्दीत सोमवारी सकाळी ब्रेक निकामी झाले. त्यामुळे चालक सुरेश सखाराम खाडे (वय ५०, रा. खाडेवाडी, जि. बीड) याचे ट्रकवरील नियंत्रण सुटले. त्यावेळी सोबत असलेला दुसरा चालक अनिल केकाण व क्लीनर अशोक चौरे (दोन्ही रा. बीड) यांनी प्रसंगावधान राखत अपघात ट्रकमधून उडी मारली. त्याचवेळी अनियंत्रित ट्रकने लेनवरून चालणाऱ्या फोर्ड कार (एमएच-१२-एसक्यू-१५८८), कंटेनर टेलर (एमएच-४६-एएफ-८८२८) यांना ठोकर दिली. कंटेनर ट्रेलरने पुढे शिवशाही (एमएच-६-बीडब्ल्यू-४३११) बसला पाठीमागून धडक दिली. या अपघातात ट्रकच्या केबीनचा चक्काचूर झाला. ट्रक चालक सुरेश सखाराम खाडे याच्या छातीवर स्टीरींग लागल्याने तो जागीच मृत्यू पावला. फोर्ड कारमधील चालक, शिवशाही बसमधील तीन प्रवासी व कंटेनर चालक तसेच ट्रकमधून उडी मारलेले दोन इसम असे एकूण सात जणांना किरकोळ दुखापती झाल्या.

अपघाताची माहिती मिळताच बोरघाट पोलीस मदत केंद्र पथक, आयआरबीचे देवदूत पथक, अपघातग्रस्त मदत पथक तातडीने घटनास्थळी रवाना झाले. त्यांनी जखमींना खोपोली नगरपालिकेच्या डॉ. आंबेडकर रुग्णालयात दाखल केले. उपचारानंतर जखमींना घरी सोडण्यात आले.

# रायगड जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला आहे. सोमवारी (दि. ८) दिवसभर पावसाच्या जोरदार सरी कोसळत होत्या. किनारपट्टीवरील भागात पावसाची तीव्रता अधिक होती. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. दरम्यान, पुढील काही दिवस जिल्ह्यात अतिवृष्टी होण्याची शक्यता प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे नदी किनाऱ्यावरील तसेच डोंगर उतारावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



रविवारी संध्याकाळापासून किनारपट्टीवरील भागात पावसाला सुरूवात झाली होती. म्हसळा, तळासह श्रीवर्धन तालुक्यात पावसाची संततधार कायम होती. सोमवार सकाळपासून जिल्ह्यातील बहुतांश भागात पावसाला सुरूवात झाली. सकाळच्या सत्रात पावसाच्या जोरदार सरी कोसळत होत्या. त्यामुळे नद्या, नाल्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली. सखल भागात पाणी शिरणे, वृक्ष उन्मळून पडणे, वीजपुरवठा खंडित होणे यासारख्या घटना घडल्या.

जिल्ह्यात सोमवारी सकाळी आठ वाजेपर्यंत संपलेल्या चोविस तासात सरासरी १०३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. श्रीवर्धन येथे सर्वाधिक २४५ मिमी, म्हसळा २१३मिमी, तळा १८२मिमी, रोहा १४५मिमी, माणगाव १२१मिमी, पोलादपूर ११३मिमी, मुरूड १०२मिमी, महाड ८९मिमी पावसाची नोंद झाली. उत्तर रायगडातील अलिबाग, पेण, पनवेल, कर्जत, खालापूर, उरण तालुक्यात तुलनेत कमी पाऊस नोंदवला गेला. मात्र सोमवारी सकाळपासून या तालुक्यातही पावसाने जोर धरला.

गेले काही दिवस पावसाने विश्रांती घेतल्यामुळे शेतकरी चिंतातूर होते. मात्र पावासाला पुन्हा सुरूवात झाल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. भात रोपे करपण्याची चिंता मिटली आहे. जिल्ह्यात वार्षिक पर्जन्यमानाच्या तुलनेत ६६टक्के पावसाची नोंद झाली आहे.

# जिल्हास्तरीय वृक्षारोपण मोहिमेचा तिघर येथे शुभारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

देशाचा अमृत महोत्सव साजरा करताना वृक्षारोपण व संवर्धन मोहीम महत्वाची आहे. या मोहिमेत पर्यावरण राखण्यासाठी आपण या परिसरात सुमारे सहा हजार देशी झाडे लावत आहोत, असे प्रतिपादन कोंकण विभागाचे महसूल उपायुक्त मनोज रानडे यांनी तिघर धनगरवाडा येथे केले.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोंकण विभाग विभागीय आयुक्त कार्यालय रोहयो शाखा आणि कर्जत तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तिघर धनगरवाडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसमोर रायगड जिल्ह्यातील वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी महसूल उपायुक्त रानडे बोलत होते. उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी हर घर तिरंगा या मोहिमेंतर्गत विद्यार्थ्यांना तिरंगा ध्वजाचे वाटप करण्यात आले. या वेळी रोहयो उपायुक्त वैशाली राज चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

मुलांना पर्यावरणाचे महत्व समजावे म्हणून हा वृक्षारोपणाचा समारंभ आयोजित करण्यात आला आहे. पुढच्या पिढ्यांनी ही परंपरा कायम ठेवणे गरजेचे आहे, असे मत वैशाली राज चव्हाण यांनी या वेळी व्यक्त केले. आंबा, कांचन, शिरस, बकुळ, कडुनिंब, पेरू, आवळा, वड, पिंपळ या देशी झाडांचे या वेळी वृक्षारोपण करण्यात आले.



(छाया : विजय मांडे)

कर्जतचे तहसीलदार विक्रम देशमुख, खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी, गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे, उपविभागीय कृषी अधिकारी बालाजी ताटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजलक्ष्मी एरकुडे, कृषी अधिकारी शीतल शेवाळे, क्षितिजा साळुंखे, संगीता पवार, प्रियांका गाडे, वनक्षेत्रपाल प्रदीप चव्हाण, विरेंद्रसिंग परदेशी, पंजाब पवार, अमृता पोफळे, संतोष जांभळे, समीर खेडकर, सरपंच जयेंद्र देशमुख, उपसरपंच मनीषा गोरे, अ‍ॅड. वसंत रवणे, भिसेगाव केंद्र प्रमुख नलिनी साळोखे, संतोष देशमुख आदींसह वनविभागाचे कर्मचारी, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# म्हसळा तालुक्याला पावसाने झोडपले

**म्हसळा : प्रतिनिधी**

तालुक्यात मागील चार दिवसापासून पावसाने झोड उठविली आहे. गेल्या तीन दिवसांत म्हसळ्यात सुमारे ४५३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे नद्या, नाले दुथडी भरुन वाहू लागले आहेत. चार दिवसापासून येथील जनतेला सूर्यदर्शन झालेले नाही.

जुलै महिन्यातील दुसऱ्या पंधरवड्यापासून पावसाने विश्रांती घेतल्याने म्हसळा तालुक्यातील बळीराजाचे लक्ष आभाळाकडे लागले होते. गेल्या तीन दिवसांपासून तालुक्यात जोरदार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे तालुक्यातील नद्या, नाले, ओढे वाहू लागले आहेत. पाऊस बऱ्यापैकी झाल्याने शेतकरी वर्ग सुखावला आहे.

**१६ ऑगस्टपर्यंत अश्लेषा नक्षत्र असून त्याचे वाहन मोर आहे. १७ ऑगस्ट रोजी सूर्य मघा नक्षत्रांत तर ३० ऑगस्ट रोजी पूर्वा फाल्गुनी नक्षत्रांत प्रवेश करणार आहे. या तीनही नक्षत्रांत कोकणातील पिकांना पुरेसे पर्जन्यमान होण्याचे संकेत आहेत.**
**-पं. महेश जोशी,**
**पंचांग आभ्यासक, म्हसळा.**

मा. गोडसे सो

पुढील तारीख १७/९/२०२२ | कोर्ट
प्रो. जमा. | अर्जदाराचे वकील
अ‍ॅड. जे.बी. आपटे

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश**
**(वरिष्ठ स्तर) यांचे कोर्टात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. ५६५/२०२२
नि. ८/ड
ने.ता. १०/०८/२०२२

श्रीमती रेखा पांडुरंग धकाते व इतर ............... **अर्जदार**
विरुध्द
कोणीही नाही ............... **सामनेवाले**

ज्याअर्थी पांडुरंग सोमा धकाते हे दिनांक ०९/१२/२०२१ रोजी मयत झाले असुन अर्जदार श्रीमती रेखा पांडुरंग धकाते व हर्षिता पांडुरंग धकाते व जान्हवी पांडुरंग धकाते रा. फ्लॅट नं. २, बेबिका सहकारी गृहरचना मर्यादीत व्हि.के. हायस्कुलच्या मागिल बाजुस यांनी मे. कोर्टाकडे सदरहु मयत पांडुरंग सोमा धकाते यांच्या खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारसाचे सर्टिफिकेट मिळावे म्हणुन अर्ज केला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

गाव मौजे पनवेल ता.पनवेल, जि. रायगड येथील फ्लॅट नं २, तळ मजला, क्षेत्र सुमारे ६२२ चौ. फुट (५७.८१ चौ. मीटर), बेबिका सहकारी गृहरचना मर्यादित, फायनल प्लॉट नं.-१२७ /१, सिटी सर्व्हे नं.-१४०२/१/१२, क्षेत्र सुमारे १०३५.०१ चौ. मीटर, व्ही. के. हायस्कुलच्या मागील बाजुस पनवेल, ता. पनवेल, जिल्हा-रायगड व गाव उलवे ता. पनवेल, जि. रायगड येथील फ्लॅट नं: ३०४, तिसरा मजला, क्षेत्र सुमारे ५९.१६६ चौ. मीटर व टेरेस/लॉफ्ट क्षेत्र ४.९२७ चौ. मीटर इमारतीचे नाव के. वी. के कोरल प्लॉट नं ९६ सेक्टर - २०, उलवे, ता. पनवेल, जिल्हा-रायगड

त्यापेक्षा सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले तारखेपासुन ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजुन हे कोर्ट सदरहु अर्जदाराला त्याचे हक्कांबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत पांडुरंग सोमा धकाते यांचे वारसाचे सर्टिफिकेट देईल. तारीख ५ माहे ०८ सन २०२२.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल

# रायगड जिल्ह्यातही इलेक्ट्रॉनिक वाहनाला पसंती

## ९६२ ई-वाहनांची नोंदणी; अलिबाग तालुक्यात सर्वाधिक मागणी

**नागोठणे : राज वैशंपायन**

रायगड जिल्ह्यात सध्या मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रॉनिक वाहनांची मागणी वाढली असून, गेल्या वर्षभरात तब्बल ९६२ इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी झाली आहे. तर शेकडो ई-वाहने प्रतीक्षा यादीमध्ये असल्याचे शोरूम मालक सांगतात.

इलेक्ट्रिक वाहनांना चालना मिळावी यासाठी सरकारकडून वेगवेगळ्या योजना आखल्या जात आहेत. पर्यावरणपूरक वाहन असल्याने ग्राहकही ई-वाहनास पसंती देत आहेत. ई-वाहनांना केवळ शहरी भागातच नाही तर ग्रामीण भागातही प्रतिसाद मिळत आहे. रायगड जिल्ह्यातदेखील ई-वाहनांना चांगली मागणी आहे.

दक्षिण रायगडमध्ये ई-वाहनांची मागणी सर्वाधिक आहे. पेण परिवहन कार्यालया अंतर्गत येणाऱ्या रोहा, पेण, तळा, माणगाव, महाड, पोलादपूर, सुधागड, कर्जत, मुरूड या तालुक्यातील लोकांनी जास्तीत जास्त इलेक्ट्रॉनिक वाहनांना पसंती दिल्याचे दिसत आहे.

ई-वाहने बॅटरीवर चालतात. ही बॅटरी घरातील विजेवर चार्जिंग करता येते. त्यामुळे इंधनाचा खर्चात २५ टक्के बचत होते. त्यामुळे ई-वाहनांची मागणी वाढत आहे. इलेक्ट्रॉनिक वाहनांचा वापर शहरी भागात मोठ्या प्रमाणावर होताना दिसतो. आता ग्रामीण भागातील नागरिकांचाही ई-वाहनाकडे कल वाढत असल्याचे दिसून येते.

**रायगडात नोंदणी झालेली ई-वाहने**
कार : ५५,
दुचाकी : ८९९,
प्रवासी रिक्षा : ३
मालवाहू रिक्षा : ५



**येणाऱ्या काळामध्ये डिझेल, पेट्रोलची कमतरता वाढत जाणार आहे. या गोष्टींचा विचार करून शासनाने इलेक्ट्रॉनिकल वाहनांचे धोरण आखले आहे. ते पर्यावरणपूरकही आहे. आर्थिकदृष्ट्या किफायतशीर आहे. त्यामुळे ग्राहकांनीदेखील पसंती दिली आहे. येणाऱ्या काळात पुरेशा प्रमाणात चार्जिंग स्टेशन उभे केल्यास ई-वाहनांना ग्राहकांकडून फार मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळेल यात शंका नाही.**
**-अभय देशपांडे, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल**

**गेल्या सहा महिन्यांपासून इलेक्ट्रॉनिक वाहन चालवत आहे. अद्याप कुठल्याही प्रकारचा अडथळा आलेला नाही. मला दररोज सात किमी प्रवास करावा लागतो. माझे दररोज दीडशे ते दोनशे रुपयांची बचत होत असून वेळही वाचत आहे.**
**-भास्कर शिंदे,**
**पोलीस कर्मचारी,**
**नागोठणे**

**MAHAVITARAN** | **TENDER NOTICE**

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estamated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | TENDER NO. EE/GOREGAON /TENDER/T-2 /2022-23 | MONTHLY METER READING OF O-PC CONSUMERS THROUGH CMRI INCLUDING DATA DOWNLOADING, RETRIVEING, ANLYSIS & BILL DISTRIBUTION & PRINTING WORK FOR THE CONSUMERS UNDER GOREGAON DIVISION | 18 LAKH | 18000/- | 1800+ 18%GST =2124/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Mahadiscom website from Dt.10.08.2022 to Dt.30.08.2022. Similarly Submission of Bid is up to 30.08.2022 till 15:00 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person-Addl.Executive Engineer Tel No.02140-250229. M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal:Mangaon Dist.-Raigad-402103.

**Executive Engineer Goregaon Division**

## निवडक

### अल्पवयीन मुलीची आत्महत्या

**नवी मुंबई :** रबाळे एमआयडीसीतील संभाजीनगर झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या ११ वर्षीय मुलीने गळफास घेत आत्महत्या केली. एवढ्या लहान वयात थेट गळफास घेत आत्महत्या केल्याने शाळा आणि राहत्या परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. आरती सोनारे असे आत्महत्या केलेल्या मुलीचे नाव आहे. रबाळेतील छत्रपती शाहू महाराज या मनपा शाळेत इयत्ता पाचवीत ती शिकत होती, तर संभाजीनगर झोपडपट्टीत राहत होती. आईने रागावले म्हणून गळफास घेतला, असे सांगण्यात येत आहे, मात्र तिच्याच वयाचा एक मुलगा तिला त्रास देत होता अशीही चर्चा आहे. त्या मुलाची चौकशी पोलिसांनीही केली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

### फकिरा पँथरद्वारे तिरंग्याचे वाटप



**नवी मुंबई :** ऐरोली विधान सभेचे प्रथम आमदार माजी संदीप नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त फकिरा पँथर सामाजिक संघटनेद्वारे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्ष व हर घर झेंडा अभियानांतर्गत तिरंगा झेंड्याचे मोफत वितरण करण्यात आले. फकिरा पँथरचे संस्थापक व अध्यक्ष ॲड. गुरू सुर्यवंशी यांच्या नेतृत्वात प्रमोद आवाड, रवी सुर्यवंशी, देवानंद कांबळे, किसन वाणी, बालाजी वाघमारे, दिलीप गायकवाड, साईनाथ सुर्यवंशी, हरिश वाकोडे, अमोल सुर्यवंशी, रोहन नारोळे महादेव कैदासे, वंश सुर्यवंशी, नवनाथ मुंडे, हरिभाऊ वाणी, सिकंदर वाणी उपस्थित होते.

### आज जादूटोणाविरोधी व्याख्यान

**नवी मुंबई :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा ३३वा वर्धापन दिन 'अंनिस' व मराठी साहित्य संस्कृती कला मंडळ, प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात येणार आहे. वर्धापन दिन मंगळवारी (दि. ९) सायंकाळी ६ वाजता, वाशीतील साहित्य मंदिर सभागृह येथे साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त ॲड. तृप्ती पाटील यांचे जादूटोणाविरोधी कायदा या विषयावर व्याख्यान आयोजीत करण्यात आले आहे, तसेच मा. प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे यांचा चमत्कार सादरीकरण व त्या मागचे विज्ञान हा प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला व मोफत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### वाशीत आज आदिवासी दिन

**नवी मुंबई :** निसर्गाला देवता मानणारा आदिवासी समाज ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन साजरा करतो. त्या पार्श्वभूमीवर आदिवासी सह्याद्री प्रतिष्ठानच्या वतीने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात आमदार गणेश नाईक, माजी महापौर सुधाकर सोनावणे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि. ९) सकाळी १० वाजता आदिवासी दिन साजरा होणार आहे. या वेळी प्राध्यापक रंजना सुपे यांचे भारतातील आदिवासी प्राचीन संस्कृती यावर मार्गदर्शन होणार आहे. प्रारंभी, सकाळी नवी मुंबईतील कोपरखेरने ते वाशी अशी आदिवासी सांस्कृतिक भव्य रैली काढण्यात येणार आहे. त्यानंतर वृक्षपूजन आणि आदिवासी क्रांतिकारकांचे प्रतिमा पूजन होऊन कार्यक्रमास सुरुवात होणार असल्याचे आयोजक संतोष भारमळ यांनी कळविले आहे.

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त

# सीकेटी विद्यालयाची हर घर तिरंगा रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. ८) स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त हर घर तिरंगा अभियानाच्या अंतर्गत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.



या रॅलीचे उद्घाटन भरत दुबे, यशवंत कुमार तिवारी आणि ठाकूरसिंग रावत या तीन निवृत्त नौसेना अधिकाऱ्याच्या हस्ते करण्यात आले. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत प्रत्येक घरावर तिरंगा फडकविण्या विषयी जनजागृती करण्यासाठी भरत दुबे यांनी मार्गदर्शन केले, तसेच माजी उपमहापौर चारुशीला घरत, संस्थेचे सहसचिव भाऊसाहेब थोरात या सर्वांनी रॅलीसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यालयातील जवळपास २०० विद्यार्थ्यांच्या सहभागाने, बँड पथकाच्या सुंदर तालावरती हर घर जल उत्सव, स्वच्छ सागर सुरक्षित सागर, स्वच्छ किनारा सुरक्षित समुद्र, भारत माता की जय, वंदे मातरम, अशा घोषणा देत नवीन पनवेलच्या परिसरात अतिशय उत्साहात व आनंदी वातावरणात या सुंदर रॅलीचे आयोजन करण्यात आले.

संस्थेचे सचिव सिद्धेश्वर गडदे, इंग्रजी माध्यमिक विभाग मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी माध्यमिक प्रभारी मुख्याध्यापक कैलास सत्रे, उच्च माध्यमिक कला विभाग पर्यवेक्षक अजित सोनवणे, वाणिज्य व विज्ञान विभाग पर्यवेक्षक प्रशांत मोरे, मराठी माध्यमिक विभाग पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग पर्यवेक्षिका संध्या अय्यर तसेच सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी वृंद या सर्वांच्या उपस्थितीने व सहकार्याने ही रॅली यशस्वीरित्या झाली.

**विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**



## पनवेल तहसीलमध्ये ध्वज विक्री केंद्र

**पनवेल : वार्ताहर**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उपक्रमात घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत नागरिकांना नाममात्र दरात तिरंगा ध्वज उपलब्ध करून देण्यासाठी पनवेल तहसील कार्यालयात ध्वज विक्री केंद्र उभारण्यात आले आहे. जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार घरोघरी तिरंगा मोहिमे अंतर्गत नागरिकांसाठी ध्वज विक्री केंद्र पनवेल तहसील कार्यालयात सुरू करण्यात आले आहे.



या उपक्रमाचा लाभ शेकडो नागरिकांनी घेतला आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीमार्फत घरांच्या यादी प्रमाणे झेंड्याची ऑर्डर देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक ग्रामपंचायतीमार्फत झेंड्याचे वाटप केले जाणार आहे. तसेच ज्या ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत त्यांच्यामार्फत मोफत वाटप केले जाणार आहे, परंतु ज्या ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत त्या सवलतीच्या दरात विक्री करणार आहेत. पनवेलच्या तहसील कार्यालयात सर्व कार्यालयप्रमुख, पोलीस विभाग आणि सर्व शाळांचे प्राचार्य व मुख्याध्यापकांची एक बैठक झाली.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त प्रचार प्रसिद्धी व जनजागृती व्हावी तसेच या मोहिमेत नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभावा या अनुषंगाने बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. नागरिकांनी १३ ऑगस्टला ध्वज उभारून १५ ऑगस्टला उतरायचा आहे. तसेच सरकारी कार्यलये, शाला, महाविद्यालये, ग्रामपंचायत यासह स्थानिक स्वराज्य संस्थांनी तिरंगा ध्वज फडकवण्याच्या सूचना देण्यात आल्या. यासह विद्यार्थ्यांच्या माध्यमातून प्रभातफेरि काढणे, पोस्टर, बॅनर, जींगल्स, आदि माध्यमातून प्रचार आणि प्रसिद्धि करण्याचे आवाहन तहसीलदार विजय तळेकर यांनी केले आहे.



**पनवेल : तालुक्यातील शिवकर येथील ग्रामस्थांनी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान आमदार प्रशांत ठाकूर यांनी ग्रामस्थांसोबत गावाच्या विकासासंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा केली.**



**उरण : भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे जिल्हाध्यक्ष सुधीर घरत यांना वाढदिवसानिमित्त आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, चिरनेर जि. प. युवा मोर्चा चिटणीस पंकेश म्हात्रे उपस्थित होते.**

## सीकेटी विद्यालयातील विद्यार्थ्यांचे उज्ज्वल यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदुस्थान टाईम्सतर्फे राष्ट्रीय स्तरावर प्रश्नमंजुषा स्पर्धा (नॅशनल क्विझ कॉम्पीटीशन) आयोजित करण्यात आली होती. ही प्रश्नमंजुषा प्रत्येक इयत्तेसाठी वेगवेगळ्या स्तरावर आयोजित केली होती.

या स्पर्धेत सीकेटी विद्यालय इंग्रजी माध्यमातील इयत्ता चौथीतील दोन विद्यार्थी आराध्य गुरूनाथ शेळके व रचना एस. वाघमारे यांनी जिल्हास्तरावर तसेच इयत्ता आठवीच्या पूजा मिंलीद नामे या विद्यार्थिनीने राज्यस्तरावर यश संपादन केले.

या स्पर्धेत विद्यार्थिनीने तालुका स्तरावर बक्षीस प्राप्त केले. त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारीणी मंडळाच्या सदस्य वर्षा प्रशांत ठाकूर, शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निलीमा शिंदे आर्दीनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढीलवाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यासोबतच संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेल मनपा माजी नगरसेवक अनिल भगत यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.



## गजानन खारपाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त उपक्रम

**उरण : बातमीदार**

आदर्श शिवभूमी शिक्षक कै. गजानन गणू खारपाटील यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त चिरनेर येथे सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे चिरंजीव पत्रकार मिलिंद खारपाटील यांनी चिरनेर, पनवेल, नेरे, खालापूर, म्हसळा, पोलादपूर, दापोली येथील वाचनलयाना दोन लाख रुपये किमतीची पुस्तके भेट दिली. याचबरोबर चिरनेर येथील आश्रम शाळेला कपाट भेट दिले

पुण्यतिथी कार्यक्रमाची सुरुवात अध्यात्मिक पोर्णिमा मंडळ यांच्या हरीपाठाने झाली. पुण्यतिथीला उद्योजक पी. पी. खारपाटील, राजा खारपाटील, प्रा. एल. बी. पाटील, सचिन तांडेल मेमोरियल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष नंदकुमार तांडेल, उरण तालुका भाजप नेते रमेश फोफेरकर भजनबुवा हरिश्चंद्र गोंधळी, तुर्भे हायस्कूलचे मुख्याध्यापक आत्माराम मांडवकर, हरिपाठ चे दत्ता मोकल आणि गोपाळ डुनगीकर, स्वाध्याय परिवारचे मधुकर फोफेरकर आणि दीपक गोरे, लायन्स क्लब उरणचे अध्यक्ष नरेंद्र ठाकूर, पत्रकार तृप्ती भोईर, दर्शना माळी आदींसह सर्वपक्षिय नेते उपस्थित होते.





**पुणे : माजी खासदार अशोक मोहोळ यांचे बंधू आणि मामासाहेब मोहोळ शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष सदानंद उर्फ अप्पासाहेब मोहोळ यांचे नुकतेच निधन झाले. हे वृत्त कळल्याने रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मोहोळ कुटूंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. या वेळी 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, मामासाहेब मोहोळ शिक्षण संस्थेचे सचिव बाळासाहेब गांजवे, संचालक रोहिदास मोरे, प्राचार्य एल. सी. खुणे आदी उपस्थित होते.**

## क्रिकेट क्लबतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक सभागृहात सीनियर-जुनियर क्रिकेट क्लब २०२१-२०२२तर्फे दहावी बारावी व पदवीधर मुलांचा गौरव करण्यात आला. सीनियर-जुनियर क्रिकेट क्लबची स्थापना झाल्यापासून विविध सामाजिक बांधिलकीचे उपक्रम दरवर्षी राबविण्यात येत असतात. असाच प्रकारे यंदा ही दहावी बारावीमध्ये पदवीधर मुलांचा गुणगौरव कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे डॉ. ययाती गांधी, कर्णधार प्रमोद पाटील, खजिनदार त्रिशूळ म्हात्रे, माजी कर्णधार भाई, सुभाष पाटील, प्रफुल पेंडसे आदी उपस्थित होते यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार व गुणगौरव करण्यात आला. क्लबचे आधारस्तंभ संजय पाटकर, ॲड. चंद्रशेखर वाडकर, आदींसह कार्यक्रमाचे निवेदन डॉ. समिता गांधी, प्रस्तावना डॉ. नितीन पोवळे यांनी केली.

या वेळी कोरोना काळात ज्या डॉक्टरने सेवा दिली, त्या डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला. त्यात सुखम हॉस्पिटलचे डॉ. संतोष जाधव व त्यांच्या पत्नी, डॉ. रवींद्र राऊत, डॉ. नितीन पोवळे, डॉ. आशिष गांधी, डॉ. मिलिंद जोशी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रमोद पाटील, त्रिशूळ म्हात्रे, प्रफुल पेंडसे, नितीन पाटील, प्रदीप पाटील, भाई पाटील,रवींद्र राऊत, सुहास देशमुख, अप्पू कुंभार, विजय पाटील, कुणाल सावंत, केदार माने, अशोक भगत, विक्रम घरत, सचिन डांगरे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.





राम प्रहर

## श्रावणधारा

### एकच छत्री दोघांमध्ये...

भरभर आल्या सरसरधारा
ऋतू मजेचा पुन्हा प्रगटला
चिंब खुशीने मनही भिजले
ढग अंधारे वारा भिजला

झिमझिम पाऊस डोईवरती
उत्साहाला आली भरती
वर्षाविहार खूप मजेचा
हात सख्याचा धरून हाती

सतरंगी मन तरंग विहरले
पानोपानी जल ओघळले
एकच छत्री दोघांमध्ये
जलधारांसम मन पाघळले

हिरवाईची गंमत बघते
झेलत धारा चालत असते
रानावरच्या धुंद हवेचे
नवलाईचे क्षण भुरभुरते

ओली हिरवी गाणी गातो
निर्झर बनुनी उडत चालतो
थेंबामधली स्पर्शत नक्षी
भिजताना तो मजला जपतो

भेट सख्याची हिरवळ ओली
पावसातल्या थेंबांमधली
हलके झोके घेता घेता
एक परी ही पुरती भिजली



**-सौ. अर्चना रमेश मुरुगकर,**
तळेगाव, दाभाडे, पुणे

# खालापूर-खोपोली मार्गावरील झाडे ऐन पावसाळ्यात सुकली

## ठेकेदाराचा बनाव उघड



(छाया : अरूण नलावडे)

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावरील खोपोली ते खालापूर या आठ किमी अंतराच्या टप्प्यात ठेकेदाराने लावलेली झाडे ऐन पावसाळ्यात सुकली असून, त्यांना टेकू देण्यासाठी वापरलेल्या फक्त काठ्या शिल्लक राहिल्या असल्याचे चित्र आहे.

खोपोली ते खालापूर या रस्त्याचे तीन वर्षापुर्वी रुंदीकरण आणि दुरुस्ती करण्यात आली. रस्ता रुंदीकरण करताना तोडलेल्या एका झाडाच्या मोबदल्यात पाच झाडे लावण्याची शासनाची नियमावली आहे. मात्र त्याचा संबंधीत ठेकेदाराला पुर्णपणे विसर पडला. त्याबद्दल बातम्या प्रसिद्ध होताच रस्ते विकास महामंडळ आणि या मार्गाचे काम करणाऱ्या ठेकेदाराने तीन वर्षे रखडलेल्या मार्गावर झाडांच्या रोपांची लगवड केली. खोपोलीतील केएमसी महाविद्यालयासमोर तर ठेकेदाराने चक्क झाडांच्या फांद्या महामार्गाच्या दुभाजकामध्ये लावल्या. सामाजिक कार्यकर्त्यांनी हा बनाव उघडकीस आणल्यानंतर ठेकेदारची भंबेरी उडाली. या बनावाचे वृत्त प्रसिध्द झाल्यानंतर रस्ते विकास महामंडळाने ठेकेदाराला वृक्षारोपण करण्याचे आदेश दिले. मात्र ठेकेदाराने बिजातून कोंब फुटलेली रोपे नुकतीच लावली. ती ऐन पावसाळ्यात सुकून गेली असून तेथे फक्त टेकू देण्यासाठी वापरलेल्या काठ्या शिल्लक राहिल्या असल्याचे दिसून येत आहे. अगदी कमी वयाच्या रोपांची लागवड केल्याने ही अवस्था झाल्याचे खालापुरातील जाणकार नागरिकांचे म्हणणे आहे.

रस्त्याच्या कामाआड येणाऱ्या वड, पिंपळ तसेच आंबा, जांभूळ, बोर, नारळ अशा फळझाडांची तोड करण्यात आली मात्र त्याबदल्यात शोभेच्या फुलांची व रानटी झाडे लावण्यात आली, हे चुकीचे आहे, असे खालापूर पंचायत समितीचे उपसभापती शामसुंदर साळवी यांनी सांगितले.

**खोपोली-खालापूर या मार्गाच्या दुभाजकामध्ये तीन वेळा झाडे लावली, मात्र ती जगली नाहीत. पुन्हा झाडे लावण्यात येत आहेत. वृक्षतोड केलेल्या झाडांच्या बदल्यात शेडवली पाणीपुरवठा योजनेशेजारी व शिळफाटा येथील फॉरेस्ट चेकनाक्यासमोर वृक्ष लागवड करण्यात आली आहे.**
**-नजिम खान, ठेकेदार**

**लागवड केलेली रोपे करपली असतील तर पाहणी करून ठेकेदाराला जाब विचारु. तसेच पाच वर्षे वयाची व कोणती झाडे लावावीत, अशी काही नियमावली आहे का, हे तपासून पहावे लागेल.**
**-श्री. सोनावणे, मुख्य अभियंता,**
**राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे विभाग**

# नागोठण्यात धर्म फेरी

## अनेक तरुण-तरुणींचा सहभाग

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे नगरीत हिंदू जनजागृती मंचच्या वतीने रविवारी (दि. ७) नागोठणे शहरात धर्म फेरी काढण्यात आली होती. या धर्म फेरीत शेकडो तरुण-तरुणी सहभागी झाले होते.

नागोठणे शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात ग्रामदैवत जोगेश्वरी मातेचे पूजन करून प्रेरणा मंत्राने रविवारी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास धर्म फेरीची सुरुवात करण्यात आली. हिंदू जनजागृती मंचाचे अध्यक्ष योगेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौकातून काढण्यात आलेल्या या धर्म फेरीत हर हर महादेव, भारत माता की जय, छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय, वंदे मातरम, हिंदू राष्ट्र की जय, हिंदू धर्म की जय, गर्व से कहो हम हिंदू है, अशा घोषणा देण्यात आल्या.

बाजार पेठ, खुमाचा नाका, केएमजी प्रवेशद्वार, म. गांधी चौक, जोगेश्वरी माता मंदिर, ग्रामपंचायत कार्यालय मार्गे धर्म फेरी पोलीस ठाण्यात आल्यानंतर सर्व हिंदूंच्या वतीने पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. दरम्यान, हिंदू जन जागृती समितीचे प्रवक्ते सतीश कोचरेकर, मोहन पार्टे व गोवर्धन पोलसानी यांनी हिंदू धर्मावर होणारे अत्याचार,जबरदस्तीने होणारे धर्मांतर, लव जिहाद तसेच धर्माबाबत माहिती दिली. देशासाठी वीरमरण आलेल्या जवानांना श्रद्धांजली वाहिल्यानंतर ध्येय्य मंत्राने या धर्म फेरीची सांगता करण्यात आली.



(छाया : राज वैशंपायन)

## कोंझर शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोंझर येथील प्राथमिक शाळेत जनसंवाद रुरल डेव्हलपमेंट अ‍ॅण्ड वेल्फेअर असोसिएशन आणि श्री हरी केमिकल एक्स्पोर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.



असोसिएशनचे अध्यक्ष निलेश पवार, उपाध्यक्ष चंद्रकांत कोकणे, शाळा समितीचे अध्यक्ष मनोहर कदम, अविनाश चव्हाण, राजू रेवणे यांनी या वेळी मनोगत व्यक्त केले. असोसिएशनचे सदस्य अनंत पवार, मुबीन देशमुख, पत्रकार उदय सावंत, निवृत्त मुख्याध्यापक अनंत कांबळे, शिक्षक गणेश मधुकर दहिभाते आदी या वेळी उपस्थित होते.

## कर्जतमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**कर्जत : बातमीदार**

मुंबईतील शुभ्रा प्रकल्प या सेवाभावी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी कर्जत शिक्षण प्रसारक मंडळाच्या चिंचवली-डिकसळ येथील भाऊसाहेब राऊत ज्युनियर कॉलेजमधील १५आदिवासी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केले.



(छाया : संतोष पेरणे)

शुभ्रा प्रकल्पच्या प्रमुख भाग्यश्री वर्तक आणि मुंबई येथील स्वातंत्र्यवीर सावरकर अभ्यास मंचच्या कार्यकर्त्या सुजाता आपटे यांच्या हस्ते आदिवासी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. कर्णबधीर विद्यार्थी शोधण्याचे काम आमच्या संस्थेकडून केले जात असून, अगदी कमी वयाची कर्णबधीर बालके शोधून त्यांच्यावर उपचार करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे भाग्यश्री वर्तक यांनी या वेळी सांगितले.

प्रा. मोहन शेळके, प्रा. सायली थोरवे आणि कुणाल माने यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. शाळेचे मुख्याध्यापक पी. डी. वाखारकर, सामाजिक कार्यकर्ते किशोर गायकवाड यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

# हर घर तिरंगा अभियानांतर्गत पेणमध्ये जनजागृती रॅली



(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या 'हर घर तिरंगा'अभियानाविषयी जनजागृती करण्यासाठी पेणमध्ये रॅली काढण्यात आली होत. या जनजागृती रॅलीमध्ये पेणमधील प्रायव्हेट हायस्कूल, सार्वजनिक विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेज, नगर परिषद उर्दू शाळा, पेण एज्युकेशन प्राथमिक शाळा यांच्यासह विविध कॉलेज व शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते.

पेण शहरातील महावीर मार्ग, गांधी मंदिर रस्ता, पेण नाका, राजू पोटे मार्ग, चिंचपाडा रोड आदी परिसरातून ढोल, ताशांच्या गजरात फिरविण्यात आलेल्या या रॅलीमध्ये भारत माता की जय, वंदे मातरम, जय जवान जय किसान अशा देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. सार्वजनिक विद्यामंदिर ज्युनिअर कॉलजेच्या रॅलीमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभूषा केलेल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

पेणचे नायब तहसीलदार रमाकांत कालेकर, माजी सैनिक सुरेंद्र ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या वेळी पेण नाक्यावरील साई मिठाई या दुकानाच्या मालकाने रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना पेढे वाटप केले. सर्व रॅलींची सांगता आपापल्या विद्यालयात करण्यात आली.

## विद्यार्थ्यांनी बनविलेल्या राख्यांना स्थानिक बाजारपेठेत मागणी

**कर्जत : बातमीदार**

अभिनव ज्ञान मंदिर संस्थेच्या कडाव (ता. कर्जत) येथील शिशुमंदिर शाळेतील विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाचे औचित्य साधून सुमारे ४००राख्या तयार केल्या असून त्यांच्या विक्रीसाठी स्टॉल लावण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी बनविलेल्या या राख्या खरेदीसाठी स्थानिक बाजारपेठेत गर्दी होत आहे.

पाठ्यपुस्तकीय ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांना आर्थिक व्यवहार समजण्यासाठी शाळेने हा उपक्रम राबविला. प्रथम इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका करुणा तांडेल यांनी राख्या बनविण्याचे प्रशिक्षण दिले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सुमारे ४००राख्या बनवून आपले कौशल्य दाखविले. या राख्या विक्रीसाठी मुख्याध्यापिका अंजली गुरव यांच्या संकल्पनेतून पाच स्टॉल लावण्यात आले. या वेळी राखीविक्रीतून सुमारे ४,५००रुपये मिळाले. उपक्रमास शिशु मंदिर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चंद्रकांत कुडे, शिक्षिका पुष्पा मोहिते, अलका कोशे, अर्चना भोसले, प्रगती कडू, भाग्यश्री म्हात्रे,सोनाली पवार, पुनम गायकर, माया गंगावणे यांच्यासह पालकांनी सहकार्य केले.



## उमेश बिरारी माणगावचे नवे प्रांत अधिकारी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावच्या प्रांताधिकारी प्रशाली जाधव-दिघावकर यांची बदली मुंबई येथे उपजिल्हा निवडणूक अधिकारी पदावर झाली असून त्यांच्या जागी उमेश बिरारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उमेश बिरारी यांनी शुक्रवारी (दि. ५) माणगाव प्रांत पदाची सूत्रे स्वीकारली. त्यांचे कर्मचाऱ्यांनी स्वागत केले.



उमेश बिरारी हे २००१मध्ये महसूल विभागात रुजू झाले. त्यांनी चोपरा (जि. जळगाव), राहुरी (जि. नगर), दिंडोरी (जि. नाशिक) येथे तहसीलदार म्हणून तसेच रत्नागिरी व पालघर येथे जिल्हापुरवठा अधिकारी म्हणून काम पाहिले आहे. माणगाव येथे येण्यापूर्वी श्री.बिरारी हे मुंबई पश्चिम उपनगरे येथे उपविभागीय अधिकारी पदावर कार्यरत होते.

## माणगावमध्ये मोफत नेत्र तपासणी शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

नवीन पनवेल येथील शंकरा आय हॉस्पिटल आणि तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा भातवाले व मेथा परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने माणगाव येथील न्यूज पेपरवाले पितांबर मेथा यांच्या हॉलमध्ये बुधवारी (दि. ३) मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते. ३६ रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.

शंकरा आय हॉस्पिटलचे डॉ. प्रकाश पाटील व सहकाऱ्यांनी शिबिरार्थींची नेत्र तपासणी करून मोतीबिंदू असलेल्या १६ रुग्णांना नवीन पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया केल्या. नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांनी शिबिराला सदिच्छा भेट दिली. उद्योजक विजयशेठ मेथा, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा, सुप्रिया शिंदे यांनी शिबिर यशस्वी केले.




(छाया : सलीम शेख)

**दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आम्ही मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करतो. या शिबिरात गेल्या सहा महिन्यांत माणगाव, महाड, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, पोलादपूर, रोहा आदी तालुक्यांतील सुमारे २५० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.**
**-विजयशेठ मेथा, आयोजक,**
**नेत्र तपासणी शिबिर, माणगाव**

# विद्यार्थ्यांनी जीव ओतून काम करावे -डॉ. नितीन आरेकर

## मुंबई विद्यापीठाच्या सांस्कृतिक युवा महोत्सवाचा कर्जतमध्ये समारोप

**कर्जत : प्रतिनिधी**

स्पर्धा म्हटली की, जय पराजय होतच असतो. त्याकडे लक्ष न देता आपण आपले ध्येय्य गाठण्यासाठी मेहनत करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी शिस्ती बरोबरच जीव ओतून काम करावे, म्हणजे यश निश्चित मिळेल, असा सल्ला मुंबई विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. नितीन आरेकर यांनी कर्जत येथे दिला.

मुंबई विद्यापीठाच्या उत्तर रायगड विभागाच्या ५५ व्या सांस्कृतिक युवा महोत्सवाचा समारोप कर्जतच्या कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात करण्यात आला. त्यावेळी डॉ. नितीन आरेकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते.

या महोत्सवात कर्जत, पनवेल, खालापूर, उरण तालुक्यातील २९महाविद्यालयातील पंधराशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यात पनवेल येथील सीकेटी महाविद्यालाच्या विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त पारितोषिके पटकावली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनीषा चौधरी यांनी केले. विद्यपीठ समन्वयक डॉ. निलेश सावे, संस्थेचे खजिनदार प्रदीपचंद्र श्रुंगारपुरे, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, जिल्हा समन्वयक डॉ. पराग कारूळकर, डॉ. दीपक गायकवाड यांच्यासह विद्यार्थी आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विविध स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक मिळविलेली महाविद्यालये



(छाया : विजय मांडे)

| | |
|---|---|
| रांगोळी | : अभिनव ज्ञान मंदिर, महाविद्यालय, कर्जत |
| कोलाज | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल |
| कार्टुनिंग | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल |
| क्लाय मॉडेलिंग | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल |
| मेहेंदी | : कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर कॉलेज ऑफ फार्मसी, कर्जत |
| ऑन द स्पॉट पेंटिंग | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल |
| इंडियन लाईट वोकॅल | : पिल्लई महाविद्यालय, नवीन पनवेल |
| इंडियन ग्रुप साँग | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल |
| शास्त्रीय गायन | : सेंट विल्फ्रेड फार्मसी महाविद्यालय, पनवेल |
| क्लासिकल वादन | : एमपीएस महाविद्यालय, पनवेल |
| वेस्टर्न सोलो | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल व पिल्लई महाविद्यालय, न. पनवेल |
| वेस्टर्न इन्स्ट्रुमेंट सोलो | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल आणि कोंकण ज्ञानपीठ महाविद्यालय, उरण |
| नाट्यसंगीत | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल |
| स्टोरी रायटिंग ग्रुप ब | : पिल्लई महाविद्यालय, पनवेल |
| स्टोरी टेलिंग ग्रुप अ | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल |
| डिबेट ग्रुप ब | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल |
| डिबेट ग्रुप अ | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल |
| एलोकशन ग्रुप ब | : पिल्लई महाविद्यालय, पनवेल |
| एलोकशन ग्रुप अ | : एमपीएएस महाविद्याल, पनवेल |
| मोनो ऍक्ट ग्रुप क | : कोंकण ज्ञानपीठ महाविद्यालय, उरण |
| मोनो ॲक्ट ग्रुप अ | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल |
| स्किट ग्रुप क | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल |
| स्किट ग्रुप अ | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल |
| माईम | : सीकेटी महाविद्यालय, पनवेल |
| एकांकिका हिंदी | : पिल्लई महाविद्यालय, पनवेल |
| एकांकिका मराठी | : कोंकण ज्ञानपीठ महाविद्यालय, उरण |
| क्लासिकल डान्स | : कोंकण ज्ञानपीठ महाविद्यालय, कर्जत |
| फोक डान्स | : केएलई, कळंबोली |

# महिला टीम इंडियाला ‘रौप्य’

## राष्ट्रकुल स्पर्धा

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**


बर्मिंगहॅम येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत महिलांच्या टी-२० क्रिकेटमध्ये भारतीय संघाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा नऊ धावांनी पराभव केला.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच महिलांच्या टी-२० क्रिकेटचा समावेश करण्यात आला होता. त्यात सुवर्णपदक जिंकून ऑस्ट्रेलियाच्या संघाने प्रथम विजेता होण्याचा मान मिळवला आहे. एजबस्टन क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सुवर्णपदकाच्या लढतीत भारताला २० षटकांमध्ये १६२ धावांचे लक्ष्य मिळाले होते, मात्र भारतीय संघ १९.३ षटकांमध्ये सर्वबाद १५२ धावा करू शकला.



सामन्याच्या दुसऱ्या डावात फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरलेल्या भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली नाही. सलामीवीर स्मृती मंधाना सहा, तर शफाली वर्मा ११ धावा करून बाद झाल्या. त्यानंतर आलेल्या जेमिमाह रॉड्रिग्ज आणि कर्णधार हरमनप्रीत कौरने भारतीय डावाला आकार दिला. दोघींनी चौफेर फटकेबाजी करून भारताच्या विजयाच्या आशा पल्लवित केल्या होत्या. हरमनप्रीतने ४३ चेंडूंत ६५ धावांची खेळी केली, तर जेमिमाहने ३३ चेंडूंत ३३ धावा फटकावल्या, मात्र त्या दोघी बाद झाल्यानंतर एकही भारतीय खेळाडू मैदानावर टिकू शकला नाही.

तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाची कर्णधार मेग लॅनिंगने भारताविरुद्ध नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. ऑस्ट्रेलियाची सुरुवात खराब झाली. संघाची धावसंख्या नऊ असताना सलामीवीर ॲलिसा हेली बाद झाली. यानंतर बेथ मूनी आणि कर्णधार लॅनिंगने दुसऱ्या गड्यासाठी अर्धशतकी भागीदारी केली, मात्र ऑस्ट्रेलियन कर्णधार ३६ धावांवर धावबाद झाली. प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने आठ गड्यांच्या मोबदल्यात १६१ धावा केल्या होत्या. सलामीवीर बेथ मुनीने सर्वाधिक ६१ धावा केल्या.



## भारतीय बॅडमिंटनपटू श्रीकांतला कांस्यपदक

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताचा बॅडमिंटनपटू किदांबी श्रीकांतने पुरुष एकेरीत कांस्यपदक पटकाविले. त्याने सिंगापूरच्या जिया हेंग तेहचा २१-१५, २१-१८ असा पराभव केला.

पहिल्या फेरीत जिया हेंग तेहने श्रीकांतला कडवे आव्हान दिले होते, मात्र श्रीकांतने उत्तम खेळ खेळत जिया हेंग तेहचा २१-१५ने पराभव केला, तर दुसऱ्या फेरीतही जिया हेंग तेहचा २१-१८ने पराभव करीत कांस्यपदकावर नाव कोरले.

## भारतीय महिला हॉकी संघाने संपवला १६ वर्षांचा दुष्काळ

**नवी दिल्ली** : राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला हॉकी संघाने कांस्यपदक पटकाविले आहे. भारतीय संघाने पेनल्टी शूटआऊटमध्ये न्यूझीलंडचा २-१ अशा फरकाने पराभव केला. तब्बल १६ वर्षांच्या कालावधीनंतर भारतीय महिला हॉकी संघाने राष्ट्रकुल स्पर्धेत पदक मिळवले आहे.

निर्धारित ६० मिनिटांच्या खेळात दोन्ही संघांनी १-१ गोल केला होता. सलीमा टेटेने भारतासाठी पहिला गोल केला, तर न्यूझीलंडच्या ऑलिव्हिया मेरीने शेवटच्या क्षणी गोल करीत सामना पेनल्टी शूटआऊटमध्ये नेला. तिथे भारतीय कर्णधार सविता पुनियाने शानदार गोलकीपिंग करून न्यूझीलंडचे प्रयत्न हाणून पाडल्याने भारताला पदक जिंकण्यात यश आले. भारताने २००२मध्ये सुवर्ण आणि २००६मध्ये रौप्यपदक जिंकले होते.






## फुटबॉल स्पर्धेमध्ये कालिना रेंजर संघ विजेता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल फुटबॉल क्लब आणि रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल तालुका व नवी मुंबईस्तरीय टर्फकोर्ट फुटबॉल स्पर्धा रविवारी (दि. ७) झाली. स्पर्धेत कालिना रेंजर हा अंतिम विजेता व बीवायबीएफसी हा संघ उपविजेता ठरला.

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये स्पर्धा झाली. या स्पर्धेचे उद्घाटन रविवारी रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे एमडी व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या स्पर्धेत १६ संघांनी सहभाग घेतला. अंतिम सामना कालिना रेंजर आणि बीवायबीएफसी यांच्यात झाला. त्यात कालिना रेंजरने बाजी मारली. बेस्ट प्लेअर म्हणून कालिना रेंजर यांच्या डीऑन यास व बेस्ट गोलकीपर स्कॉट यांना विशेष स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभाला भाजप कोपरचे अध्यक्ष सुधीर ठाकूर व भारतीय मजदूर संघाचे उलवे अध्यक्ष किशोर पाटील यांचेसह स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे व्यवस्थापक प्रणित गोंधळी उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मनोज म्हात्रे, हिमांशू वनवेरु व यश वनवेरु यांनी परिश्रम घेतले.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com